रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक १४५
www.ramprahar.com
◆ शुक्रवार, १२ डिसेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग
रसायनीतील एचआयएल कंपनीत कोल्ह्याची एन्ट्री/२
'कांदळवनांची कत्तल करणाऱ्यांवर कारवाई करा'/५
राष्ट्रीय तायक्वॉन्डो स्पर्धेसाठी रायगडच्या खेळाडूंची निवड/८

## देशातील सर्वात मोठे शिपयार्ड महाराष्ट्रात उभारा -मुख्यमंत्री



**नागपूर :** राज्याला लाभलेला ७२० किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा, निर्माणाधीन वाढवण बंदर आणि सागरी क्षेत्रातील अपार संधी लक्षात घेता २०२६ मध्ये देशातील सर्वात मोठे शिपयार्ड महाराष्ट्रात उभारावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. विधान भवन स्थित मंत्रीपरिषद सभागृहात आयोजित बैठकीत बंदरे विकास विभागाचा आढावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. या वेळी मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, देशातील सर्वात मोठे शिपयार्ड करण्यासाठी विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करावा. यासाठी जागेची निश्चिती करण्यात यावी. जयगड, आंग्रे, रेडी व विजयवाडा बंदरांचा विकास करण्यासाठी वैभववाडी ते कोल्हापूर रेल्वेमार्ग तयार करावा. या मार्गासाठी राज्य शासनाच्या आर्थिक सहभागाची तरतूद करण्यात यावी.

# पोलिसांना हक्काची घरे मिळणार

### वसाहतींच्या पुनर्विकास धोरणाचा निर्णय



(संग्रहित छायाचित्र)

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील पोलिसांसाठी आनंदाची बातमी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी पोलिसांच्या घरांबाबत मोठा निर्णय घेतला आहे. मुंबईतील सर्वच पोलीस वसाहतींचा पुनर्विकासासाठी धोरण तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली जाणार आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांसोबत झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा निर्णय घेतला आहे. यामुळे आगामी काळात पोलिसांनी कमी किंमतीत हक्काची घरे मिळणार आहेत.

मुंबईतील पोलिसांना घरे देण्यासाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. आता शहरातील सर्व पोलिस वसाहतींचा पुनर्विकास करण्यासाठी एक धोरण आखले जाणार आहे. यासाठी अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली जाणार आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यात कुलाब्यातील पोलीस वसाहतींच्या प्रश्नासाठी बैठक झाली. या बैठकीत पोलिस वसाहतींचा पुनर्विकासासाठी धोरण तयार करण्याचा निर्णय झाला आहे. त्यामुळे आगामी काळात पोलिसांच्या घराचा प्रश्न सुटणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा निर्णय घेताना दोन महिन्यात याबाबतीत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे आता लवकरच पोलिसांच्या घराचा प्रश्न सुटणार आहे. यामुळे मुंबई बाहेरील उपनगरात राहून नोकरीसाठी मुंबईत येणाऱ्या पोलिसांसाठी शहरातच हक्काची घरे मिळणार आहेत. त्यामुळे त्यांचा प्रवासाचा वेळ वाचणार आहे.

# शेकाप नेत्या चित्रलेखा पाटील यांच्याविरोधात शिवसेनेचे 'जोडे मारो'

**पोलादपूर, श्रीवर्धन : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांच्याप्रती आक्षेपार्ह व सत्यता सिध्द न झालेला व्हिडिओ शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या चित्रलेखा पाटील यांनी सोशल मीडियावर व्हायरल केल्याप्रकरणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यासमोर पोलादपूर तालुका शिवसेना आणि युवासेनातर्फे जाहीर निषेध नोंदविला.



दरम्यान, श्रीवर्धन शहरातील शिवाजी महाराज चौकामध्ये शिंदे गटाच्या शिवसैनिकांनी एकत्र येत शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या चित्रलेखा पाटील यांच्या बॅनर वरील चित्राला जोड्यांनी मारले.

या वेळी संतप्त शिवसैनिकांनी चित्रलेखा पाटील यांच्या विधानाचा आणि व्हिडिओ व्हायरल करण्याच्या कृतीचा तीव्र शब्दांत निषेध केला. **(पान २ वर..)**

## चारोळी संग्रहाचे प्रकाशन



**पनवेल : कवी, लेखक, चारोळीकार अनिल दाभाडे यांच्या चांदण्या आणि मी...या चारोळी संग्रहाचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे हस्ते झाले. त्यांनी संग्रहातील काही चारोळ्या वाचून सादर केल्या व दाभाडे यांना पुढील लेखनासाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी पत्रकार व कोकण मराठी साहित्य परिषद शाखा नवीन पनवेलचे अध्यक्ष गणेश कोळी, सुमंत नलावडे, साहित्यिक काशिनाथ जाधव उपस्थित होते.**

# पनवेल पंचशील नगर झोपडपट्टीत आग : अनेक झोपड्या जळून खाक

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल पूर्वेकडील पंचशील नगर झोपडपट्टी परिसरात भीषण आग लागली. गुरुवारी (दि.११) दुपारच्या सुमारास झालेल्या या घटनेमुळे परिसरात काही मिनिटांतच गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. आग वेगाने पसरत असल्याने अनेक झोपड्या जळून खाक झाल्या असून नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. दरम्यान, आग हाय टेन्शन इलेक्ट्रिसिटीची वायर तुटल्याने की घरात सिलेंडरचा स्फोट झाल्याने लागली हे अद्याप निश्चित झालेले नाही.



आगीची माहिती मिळताच पनवेल शहर पोलीस, वाहतूक शाखा, महावितरण अधिकारी आणि अग्निशामक दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशमन दलाने तत्काळ पाण्याचे फवारे मारत आग नियंत्रणात आणण्यास सुरुवात केली. अग्निशामक कर्मचारी सतर्क राहून आगीवर नियंत्रण मिळविण्यास यशस्वी ठरले. गंभीर बाब म्हणजे विचुंबे गाढी नदी पूल, पोदी स्मशानभूमी, विसपुते कॉलेज, सेक्टर १५, पंचशील नगर, श्रीयश हॉस्पिटल ते नवीन पनवेल ब्रिजपर्यंत तब्बल तीन किलोमीटर हाय टेन्शन वायर लोंबकळत असल्याचे समोर आले.

घटना पनवेल रेल्वे स्टेशनच्या पूर्वे कडील पार्किंग आणि रिक्षा स्टँड परिसरात घडली. यात पार्किंगमध्ये ठेवण्यात आलेल्या दुचाकींचेसुद्धा मोठे नुकसान झाले आहे. बिकानेर स्वीट्स समोरील हाय टेन्शन टॉवरवरून वायर तुटली आणि झोपड्यांवर कोसळताच आग लागली असल्याचे प्रत्यक्षदर्शीने सांगितले आहे. ही दुर्घटना शाळा भरण्याच्या आणि सुटण्याच्या महत्त्वाच्या वेळेत घडल्याने शाळकरी मुलांच्या सुरक्षिततेबद्दल पालकांमध्ये भीती निर्माण झाली. तर स्टेशन परिसरातही प्रवाशांची गर्दी वाढली आणि वाहतुकीत अडथळे निर्माण झाले.

घटनेची माहिती मिळताच माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, पनवेल नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष संदीप पाटील आणि टीआयपीएलचे जगदीश घरत घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी नागरिकांची विचारपूस करत प्रशासनाला मदतकार्य गतीमान करण्याचे निर्देश दिले.

## निवडक

### इंडिगो कंपनी १० हजार रुपयांचे प्रवासी कुपन देणार

**नवी दिल्ली :** विमान उड्डाण रद्द झालेल्या प्रवाशांना इंडिगो कंपनी १० हजार रुपयांचे प्रवासाचे कूपन देणार आहे. या कुपनचा वापर वर्षभराच्या आत इंडिगोचे तिकीट आरक्षित करण्यासाठी करता येईल. ३ ते ५ डिसेंबरच्या दरम्यान उड्डाण रद्द झालेल्या, विमानतळावर अडकून पडलेल्या प्रवाशांना ही कूपन दिली जातील, असे कंपनीने पत्रक काढून स्पष्ट केलेय.



### गोव्यातील नाईट क्लब आग प्रकरण; लुथरा ब्रदर्सना अटक

**पणजी :** गोव्यातील बिर्च बाय रोमिओ लेन नाईट क्लबमध्ये लागलेल्या आगीत २५ जणांचा मृत्यू झाला होता. ज्या रात्री ही घटना घडली,त्याच रात्री या क्लबचे मालक गौरव आणि सौरभ लुथरा देश सोडून थायलंडला पळून गेले.या दोघांना आता तिथे ताब्यात घेण्यात आलं आहे. याआधी गोवा पोलिसांनी नाईट क्लबच्या पाच कर्मचाऱ्यांना आणि व्यवस्थापकांना अटक केली आहे.

## नेरूळ-मुंबई जलप्रवास येत्या सोमवारपासून होणार सुरू



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईच्या रहिवाशांसाठी एक अत्यंत चांगली बातमी आहे. गेल्या अनेक दिवसांपासून थांबलेली नेरुळ-मुंबई फेरी सेवा अखेर १५ डिसेंबर २०२५ पासून सुरू होणार आहे. ही सेवा सुरू झाल्यामुळे सिडकोने विकसित केलेल्या नेरूळ पॅसेंजर वॉटर टर्मिनलला पूर्णपणे वापरात आणण्याची संधी मिळणार आहे.

या नवीन प्रवासी फेरी सेवेमुळे नेरूळ ते भाऊचा धक्का (मुंबई) हा प्रवास आता खूप कमी वेळेत पूर्ण करता येणार आहे. सध्याचा वेळ (रस्ते मार्ग): सुमारे ९० मिनिटे फेरीद्वारे प्रवासाचा वेळ: केवळ ३० मिनिटे आहे. मीडिया रिपोर्टनुसार, सुरुवातीला २०-सीटर बोट वापरून दररोज चार ट्रिप चालवल्या जातील. प्रवासाचे भाडे: प्रति प्रवासी ९३५ रुपये निश्चित करण्यात आले आहे.

सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंगल यांनी फेरी सेवेला या क्षेत्रासाठी एक महत्त्वाचे पाऊल म्हटले आहे. एअरपोर्ट, मेट्रो आणि नवीन रस्ते प्रकल्पांच्या प्रगतीदरम्यान आता वॉटर ट्रान्सपोर्ट (जलवाहतूक) देखील एक मोठा दुवा बनणार आहे. हा मार्ग प्रवासाचा वेळ कमी करून प्रादेशिक गतिशीलता मजबूत करेल, असे सिंगल म्हणाले.

फेरी ऑपरेटर 'वॉटरफ्रंट एक्सपिरियन्स मुंबई प्रायव्हेट लिमिटेड' ने सांगितले की, नेरूळ-मुंबई मार्गावर सुरक्षा उपाय अधिक मजबूत केले आहेत. सर्व प्रवाशांना बोटमध्ये चढताना लाईफ जॅकेट घालणे अनिवार्य असेल.

## अरुणाचल प्रदेशात ट्रक दरीत कोसळून १४ कामगारांचा मृत्यू

**इटानगर :** अरुणाचल प्रदेशमध्ये चीनच्या सीमेजवळ २२ कामगारांना घेऊन जाणारा एक ट्रक दरीमध्ये कोसळल्याची घटना घडली आहे. या दुर्घटनेत आसामचे रहिवासी असलेल्या १४ लोकांचा मृत्यू झाला आहे. भारतीय लष्कराने या भागात शोध आणि बचाव मोहिम सुरू केली आहे. प्राथमिक माहितीनुसार, ही दुर्घटना सोमवारी घडली, मात्र दुर्घटनेतील बचावलेला एक व्यक्ती बुधवारी रात्री प्रशासकीय अधिकार्यांपर्यंत पोहचल्यानंतर या भीषण अपघाताबद्दल माहिती मिळाली.

अरुणाचल प्रदेशच्या चागलगाम येथील डोंगरात भारतीय लष्कराकडून एक मोठी शोध आणि बचाव मोहिम सुरू करण्यात आली आहे. तिंसुकिया येथील २२ कामगारांना घेऊन जाणेरे एक सिव्हीलियन वाहन केएम ४० जवळील एका दरीत केसळल्यानंतर ही मोहिम राबवली जात आहे, असे लष्कराने जारी केलेल्या निवेदनात सांगण्यात आले आहे. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी दुर्घटनेत १४ लोकांचा मृत्यू झाल्याची पुष्टी केली आहे. आवश्यकता असलेल्यांना तात्काळ वैद्यकीय मदत पोहचेल याची काळजी घेतली जात असल्याचेही ते म्हणाले आहेत.

## लोकसभेत ना. अमित शाहांकडून विरोधकांच्या प्रत्येक आरोपाचे खंडन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी लोकसभेत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केलेल्या 'मत चोरी'च्या आरोपांना अत्यंत आक्रमक आणि सविस्तर प्रत्युत्तर दिले. विशेष म्हणजे, अमित शहा १०२ अंश ताप असतानाही जवळपास दीड तास बोलले आणि विरोधकांच्या प्रत्येक आरोपाचे मुद्देसूद खंडन केले. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही अमिज शाह यांच्या भाषणाचे कौतुक केले.

राहुल गांधी अनेक दिवसांपासून 'मत चोरी'चा मुद्दा उचलत आहेत. त्यांनी या मुद्द्याला 'हायड्रोजन बॉम्ब' असेही संबोधले आहे. बिहार निवडणुकीपूर्वीही विविध सभांमध्ये त्यांनी हा विषय मांडला होता. संसदेच्या हिवाळी अधिवेशनातही त्यांनी हा मुद्दा पुन्हा समोर आणला. यावर प्रतिक्रिया देताना अमित शहा म्हणाले की, मला काय बोलायचं आणि कधी बोलायचं हे



कुणी ठरवू शकत नाही, असे सांगत त्यांनी राहुल गांधींना थेट आव्हान दिले.

विरोधकांच्या भूमिकेवर टीका करत अमित शहा म्हणाले की, जेव्हा निवडणूक तुम्ही जिंकता तेव्हा नवीन कपडे घालता, शपथ घेता आणि यादी परिपूर्ण दिसते. पण जेव्हा परिस्थिती विरोधात जाते, जसे की बिहारमध्ये झाले. तेव्हा मात्र अचानक मतदार यादीत विसंगती दिसून येते. हा दुटप्पीपणा इथून पुढे सहन केला जाणार नाही. असे शाहांनी स्पष्ट केलं. दरम्यान, या वेळी अमित शहांनी बोलायला सुरुवात करताच राहुल गांधीसह विरोधकांनी सभागृहाचा त्याग केल्याचं पाहायला मिळालं

## थंडी वाढली! ग्रामीण भागात शेकोट्या पेटू लागल्या...

**धाटाव : प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपासून रोहा परिसरात थंडीचा तडाका दिवसेंदिवस वाढत असून तापमानाचा पारा तब्बल १७ अंश सेल्सिअसपर्यंत घसरला आहे. अचानक बदललेले हवामान आणि वाढलेला गारठा यामुळे नागरिक अडचणीत आले आहेत.



सकाळ-संध्याकाळ थंड वारे अंगात शिरत असून परिसरात हिवाळ्याचा प्रकोप स्पष्टपणे जाणवत आहे. तसेच ग्रामीण भागात गल्लोगल्ली शेकोट्या पेटून ग्रामस्थ उब मिळवत आहेत, तर काही ठिकाणी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी घरी आल्यानंतर शेकोट्यांची व्यवस्था करण्यात येत आहे. पहाटे बाहेर पडणाऱ्या शेतकऱ्यांना पिकांची पाहणी करताना गारठ्यामुळे हातपाय थिजल्याची तक्रार आहे. तर धाटाव औद्योगिक क्षेत्रात असंख्य कामगार आहेत. कामावर जाणाऱ्या मजुरांना आणि वाहनचालकांना दाट धुक्यामुळे रस्त्यावर दृष्टीक्षेपही कमी पडत आहे.

रोहा, घोसाळे, सुतारवाडी, महादेववाडी, धाटाव, अष्टमी, कोलाड, चणेरा, उडदवणे, मेढा, खांब, परिसरात सायंकाळी सहा-सातनंतर थंडीचा जोर इतका वाढतोय की घरात बसतानाही स्वेटर, जॅकेट, कानटोपरे वापरण्याची वेळ आली आहे. बाजारपेठेतही हिवाळी कपड्यांची मागणी अचानक वाढल्याचे दुकानदार सांगतात. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आरोग्याच्या तक्रारी असलेल्यांना या वाढत्या थंडीचा अधिक त्रास होऊ लागल्याने डॉक्टरांनी उबदार पाणी पिणे, शरीर झाकून ठेवणे आणि सकाळी बाहेर न पडण्याचा सल्ला दिला आहे.

सकाळी आठ-नऊ वाजेपर्यंत कडाक्याची थंडी कायम असल्याने गावांत चहाच्या टपऱ्यांवर गर्दी वाढली आहे. काही ठिकाणी महिलांनी घरगुती आगीच्या चुलीभोवती बसून उब घेतानाच कामे करण्याची पद्धत पुन्हा दिसू लागली आहे. तर हवामान विभागाने पुढील काही दिवस तापमानात आणखी घट होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यामुळे नागरिकांनी उबदार कपडे, गरम पाणी, आणि रात्री बाहेर न जाणे यासारख्या काळजी उपायांचे पालन करावे, असे आवाहन स्थानिक प्रशासनाने केले आहे.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून नितळस गावात रस्त्यांच्या कामांना सुरुवात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील नितळस गावामध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीमधून सुमारे ३० लाख रुपयांच्या निधीमधून अंतर्गत रस्त्यांची कामे करण्यात येणार आहेत. या कामांचे भूमिपूजन भाजप नेते एकनाथ देशेकर यांच्या हस्ते व भाजपचे पनवेल उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर यांच्या उपस्थितीत गुरुवारी (दि.११) झाले.



दरम्यान काही दिवसांपुर्वी विरोधकांनी या कामाचे श्रेय घेण्यासाठी रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन केले होते. याबाबत दिनेश खानावकर म्हाणाले की, फक्त नारळ फोडून काम होत नाही त्यासाठी पाठपुरावा करावा लगतो. जनता सुज्ञ आहे, ती भुलथापांना बळी पडत नाही. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मुळेच आपल्या पसिरामध्ये विकासकामे होत आहेत, असे सांगितले. पनवेल विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली परिसरातील पायाभुत सुविधा अधिक मजबूत होत आहेत. त्यापार्श्वभुमीवर आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीमधून आणि भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या प्रयत्नांमुळे नितळस गावातील अरविंद चौधरी यांच्या घरापासून ते बौद्धवाडी, प्रमोद भोईर यांच्या घरापासून ते बौद्धवाडी तसेच बौद्धवाडी मध्ये जाणाऱ्या रस्त्याच्या काँक्रिटीकरण करण्यात येणार आहे.

भूमिपूजनावेळी बाळकृष्ण पाटील, अंकुश पाटील, नवनाथ खुटारकर, प्रकाश खैरे, राजेश पाटील, भगवान कडू, रवी गोंधळी, माजी सरपंच नंदु भोपी, अमृता मढवी, सदस्य सुमीता काठे, दर्शना पावशे, कैलास मढवी, भार्गव सांगडे, धर्मा पावशेम धनाजी काठे, नारायण काठे, शैलेश पावशे, राजाराम गायवाड, फुलाजी म्हात्रे, मंगळदास म्हात्रे, दर्शन म्हात्रे, बाळु काठे, रुपेश पावशे, साजन पावशे, मारुती सांगडे परशुराम भोपी, दशरथ सांगडे, हरी काठे, गुरुनाथ महाराज, प्रकाश मढवी, राहुल काठे, संकेत पावशे, दिनेश पावशे, चंद्रकांत म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# भाजपच्या रेवदंडा ग्रा.प.उपसरपंच आणि सदस्या बडतर्फीला स्थगिती

**रेवदंडा : प्रतिनिधी**

जिल्हाअधिकारी न्याय कक्षेतील बडतर्फ पारीत आदेशाला कोकण आयुक्ताने स्थगिती दिल्याने रेवदंडा ग्रामपंचायत उपसरपंचपदी भाजपच्या मंदाताई बळी व भाजपच्या ग्रा.प. सदस्या दिक्षा बळी तुर्तास कायम राहिल्या आहेत.



रेवदंडा ग्रामपंचायतीत शेकापक्षाच्या वतीने कार्यकर्ते सुशिल सुर्वे यांनी जिल्हाअधिकारी यांच्या न्याय कक्षेत भाजपच्या रेवदंडा ग्रा.प. उपसरपंच मंदाताई व ग्रा.प.सदस्या दिक्षा बळी यांचे अतिक्रमण बांधकामाचे विरोधातील निकाल पारित झाला होता. त्यानुसार रेवदंडा ग्रामपंचायतीच्या भाजपच्या उपसरपंच मंदाताई बळी व ग्रामपंचायत सदस्या दिक्षा बळी यांना बडतर्फ करण्यात आल्याचा जिल्हाधिकारी न्याय कक्षेत आदेश पारित होता.

रेवदंडा ग्रामपंचायतीत महायुतीचे वर्चस्व असून भाजपच्या मंदाताई बळी उपसरपंचपद भुषवित आहेत. रेवदंडयातील शेकापक्षाचे कार्यकर्ते सुशिल सुर्वे यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या मुंबई अधिनियम क्रमांक ३ चे कलम १४ ज-३ नुसार रेवदंडा ग्रामपंचायतीच्या उपसरपंच मंदाताई बळी व ग्रा.प.सदस्या दिक्षा बळी यांचे अतिक्रमणात बांधकाम विरोधात जिल्हाधिकारी न्याय कक्षेत अर्ज दाखल केला होता.

जिल्हाअधिकारी यांचे न्यायकक्षेतील पारीत झालेल्या बडतर्फ आदेशाचे विरोधात उपसरपंच मंदाताई बळी व ग्रा.प.सदस्या दिक्षा बळी यांनी कोकण विभागीय आयुक्ताकडे अपील केले होते. या अपीलानुसार जिल्हाधिकारी न्यायकक्षेतील पारीत झालेल्या बडतर्फ आदेशाला स्थगिती देण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरू राहणार आहे. तुर्तास रेवदंडा ग्रा.प.उपसरपंचपदी भाजपच्या मंदाताई बळी व ग्रा.प.सदस्यापदी दिक्षा बळी या कायम आहेत.

# एचआयएल कंपनीत कोल्ह्याची एन्ट्री! कर्मचारी भयभीत

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनीतील केंद्र सरकारचा उपक्रम असणाऱ्या एच.आय.एल कंपनीच्या परिसरात नुकताच कोल्हा दिसल्याची घटना उघड झाल्यानंतर कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. टेक्निकल बिल्डिंगच्या आवारात कर्मचारी अविनाश तांबे यांनी दुपारच्या सुमारास कोल्हा पाहिल्याचा दावा केला आहे. त्यांनी तत्काळ मोबाईलमध्ये फोटो टिपण्याचा प्रयत्न केला, मात्र कोल्हा क्षणात निसटल्याने प्रतिमा स्पष्ट मिळू शकली नाही. तरीही मिळालेल्या फोटोंच्या आधारे तो कोल्हाच असल्याचे अनेक कर्मचारी सांगत आहेत.

एचआयएल कंपनीचा काही भाग घनदाट झाडांनी व्यापलेला असल्यामुळे परिसर जंगलमय बनला आहे. त्यामुळे मागील काही वर्षांत या भागात विविध वन्यप्राण्यांचा वावर वाढला आहे. ३ ते ४ वर्षांपूर्वी रानडुक्करांचे संचार येथे सहज



पाहायला मिळत होते. माकडे तर अजूनही संध्याकाळी झाडांवरून उड्या मारत प्लांटमधील साहित्याची तोडफोड करताना दिसत आहेत. याचदरम्यान काहींनी मोर तसेच नव्या प्रजातींचे पक्षी दिसल्याचेही सांगितले आहे. अचानक कोल्हा आढळून आल्याने कंपनीतील कर्मचारी आता सावधगिरी बाळगण्याच्या तयारीत आहेत. वनक्षेत्र जवळ असल्यामुळे वन्यप्राणी कधीही कंपन्यांच्या आवारात शिरकाव करू शकतात,

# माणगावची नवीन पाणीपुरवठा योजना रस्ते टिकवूनच पूर्णत्वास न्यावी

**माणगाव : बातमीदार**

माणगांव शहरासाठी केंद्र व राज्य शासनाच्या मंजुरीने राबविण्यात येणाऱ्या 'अमृत पाणीपुरवठा योजने'अंतर्गत कामे सुरू आहेत. शहरातील वाढती लोकसंख्या आणि विस्तारणाऱ्या वसाहती लक्षात घेता भविष्यातील २४ तास शुद्ध पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने ही योजना अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. योजनेत विद्यमान फिल्टर प्लांटचे अद्ययावत नुतनीकरण, नवीन टाक्या, एमबीआर जलकुंभ उभारणी तसेच संपूर्ण शहरात बिडा (कास्ट आयर्न) ऐवजी एसडीपी पाइपलाइन बसविण्याचे काम करण्यात येत आहे.

मात्र या कामासाठी शहरातील अनेक रस्ते नव्याने खोदण्याची आवश्यकता निर्माण होत असल्याने दळणवळणात अडथळे निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. मागील काही वर्षांत मोठ्या प्रयत्नांनंतर शहरातील मुख्य व अंतर्गत रस्ते सुधारले गेले होते. मात्र सध्याच्या



परिस्थितीमध्ये अनेक रस्त्यांची अवस्था पुन्हा खराब दिसून येत आहे. वाढती रहदारी आणि वाहनतळांमुळे कोंडीची समस्या गंभीर बनली आहे. त्यातच नवीन पाइपलाइन खोदकामामुळे रस्त्यांची आणखी हानी होऊ नये, अशी नागरिकांची मागणी आहे.

जिथे शक्य असेल तिथे रस्त्याच्या एका बाजूने खोदकाम करावे, जेणेकरून रस्ते पूर्णपणे अडथळ्यांत येणार नाहीत. मध्यभागी केलेले अर्धवट खोदकाम वाहतुकीसाठी अडथळा ठरण्यासोबतच पुढील काळात रस्त्यांचे पुनर्निर्माण कठीण होईल, भविष्यात नवीन पाईप लाईन देखील नादुरुस्त होऊ शकते, मग पुन्हा रस्ते खोदून त्यांची अवस्था बिकटच होईल! अशी भीती व्यक्त होत आहे. काही नागरिकांनी हेही मत नोंदवले की, ठेकेदार खोदकाम करून माती टाकून काम उरकून जातील व त्यानंतर रस्ते पूर्ववत करणे अवघड होईल.

ही योजना कोणत्याही राजकीय प्रेरणेतून नव्हे तर शहराच्या दूरगामी हितासाठी निर्हेतुकपणे पूर्ण व्हावी, अशी अपेक्षा माणगांवकरांनी व्यक्त केली आहे. पुढील वर्षभरात माणगांव नगरपंचायत निवडणुका होणार असल्याने हा मुद्दा संवेदनशील बनला आहे. त्यामुळे नगराध्यक्ष, पाणी सभापती, नगरसेवक, मुख्याधिकारी, कनिष्ठ अभियंता तसेच ठेकेदार यांनी या योजनेबाबत सतर्क राहून नियोजनबद्ध कार्यवाही करावी, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

# महावितरण भांडूप परिमंडलातील ग्राहकांची ऑनलाईन बिल भरण्यास पसंती

**मुंबई: रामप्रहर वृत्त**

आजच्या व्यस्त आणि धावपळीच्या जीवनात आपण सोप्या व कमी वेळ घेणार्या माध्यमांना प्राधान्य देतो. मोबाईल बिल असो, टीव्ही रिचार्ज किंवा अश्या सर्व व्यवहारासाठी सुध्दा डिजिटल पेमेंट कडे लोकांचा कल वाढला आहे. त्याचप्रमाणे, रांगेत उभे राहणे टाळण्यासाठी वीजबिल भरण्यासाठी सुद्धा ग्राहक ऑनलाइन माध्यमांना पसंती देत आहेत. महावितरणच्या भांडूप परिमंडलामध्ये नोव्हेंबर महिन्यात घरगुती, वाणिज्यिक व व्यावसायिक वर्गवारीतील लघुदाब ग्राहकांनी एकूण २० लाख ०९ हजार पेक्षा जास्त व्यवहार ऑनलाइन पद्धतीने करण्यात आलेले आहेत.

नोव्हेंबर महिन्यात, भांडुप परिमंडलातील पेण मंडळात ४,३१,०९०, ठाणे मंडळात ६,५१,५९८ तर वाशी मंडळात सर्वात जास्त ९,२६,८७८ ऑनलाइन पेमेंट करण्यात आले आहेत. जे वीज ग्राहक रांगेत उभे न राहता ऑनलाइन द्वारे वीजबिल भरतात अशा ग्राहकांनी मोठ्या संख्येने प्रोम्प्ट पेमेंट सवलतीचा लाभ सुद्धा घेतला आहे. वीजबिलाचा ऑनलाइन भरणा केल्यास ०.२५ टक्के (५०० रुपयांपर्यंत ) सूट दिली जाते. क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड, युपीआय, भीम ॲप, इंटरनेट बँकिंग, मोबाइल वॉलेट आणि मोबाइल बँकिंगद्वारे महावितरणच्या मोबाइल ॲप किंवा अधिकृत वेबसाइटद्वारे ग्राहक सोयीस्करपणे आणि सुरक्षितपणे घरबसल्या वीज बिल भरू शकतात.

विशेष म्हणजे, वीजबिलांसाठी छापील कागदाचा वापर पूर्णपणे बंद करीत केवळ 'इमेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडल्यास महावितरणतर्फे प्रतिबिलात १० रुपये सवलत देण्यात येत आहे. यात ग्राहकांचा वीजबिलामध्ये वार्षिक १२० रुपयांचा फायदा होत आहे. विशेष म्हणजे गो-ग्रीन योजनेचा पर्याय निवडल्यानंतर संबंधित ग्राहकांच्या पहिल्याच वीजबिलामध्ये पुढील १२ महिन्यांची म्हणजे १२० रुपयांची सवलत एकरकमी देण्यात येत आहे. ऑनलाईन पध्दतीने वीजदेयकाचा भरणा करणे अत्यंत सुरक्षित असून, सदर पध्दतीस भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पेमेंट व सेटलमेंट कायदा २००७ च्या तरतूदी लागू आहेत.

ऑनलाईन पध्दतीने भरणा केल्यास ग्राहकास त्वरीत त्याच्या नोंदणीकृत मोबाईल नंबर वर एसएमएस द्वारे पोच पावती मिळते.तसेच www.mahadiscom.in या संकेतस्थळावर मागे केलेल्या सर्व पेमेंट तपासल्यास भरणा तपशील व पावती उपलब्ध होते. ऑनलाईन वीज बिल भरणा पध्दत अत्यंत सुरक्षित असुन यासंदर्भात काही तक्रार अथवा शंका असल्यास ग्राहक helpdeskšpgmahadiscom.in या ई-मेल आयडीवर महावितरणशी संपर्क साधू शकतात.

# 'मोबाईलच्या अतीरेकाने विद्यार्थी खेळाचे महत्त्व विसरलेत'



**खालापूर : प्रतिनिधी**

आधुनिक युगात मोबाइलच्या अतिवापरामुळे शालेय मुलं खेळाचं महत्व विसरलेत. इनडोर आऊटडोर, सांघिक खेळापेक्षा मोबाइलवरील डिजिटल गेममध्ये मुलं अडकली आहेत त्यामुळेच मानसिक दृष्टया विकृत पिढी निर्माण होत आहे अशी चिंता माजी सैनिक, व्यंगचित्रकार भरत सावंत यांनी व्यक्त केली. सह्याद्री विद्यालयाच्या वार्षिक क्रिडा महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या सह्याद्री विद्यालय, कनिष्ठ महाविद्यालय आणि इंग्लीश स्कूलचा वार्षिक क्रिडा महोत्सवाचे उद्घाटन सोहळा मंगळवारी संपन्न झाला.

याउद्घाटन सोहळ्यासाठी माजीसैनिक, व्यंगचित्रकार भरत सावंतप्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर संस्थेचे अध्यक्ष संतोष जंगम, शालेय समिती अध्यक्ष संजय पाटील, उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांना व्यवसायाभिमुख शिक्षणही मिळावे -शिक्षणाधिकारी ललिता दहितुले

**मुरुड : प्रतिनिधी**

येथील मुरुड तालुका विज्ञान प्रदर्शनाचा बक्षीस वितरण सोहळा माध्यमिक विद्यालय काशिदच्या भव्य प्रांगणात संपन्न झाला. यावेळी रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी ललिता दहितुले यांनी विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीच्या मागे न धावता व्यवसायाकडे वळण्याच्या दृष्टीने व्यवसायाभिमुख शिक्षणाची समज शिक्षकांनी करुन देण्यास सूचवले. त्यांनी विज्ञानाचे महत्त्व विशद करताना ,प्रतिकृतींची संख्या कमी असली तरी चालेल, पण त्यात नावीन्य हवे ,असे सांगून येथील विद्यार्थी आणि मार्गदर्शक



शिक्षकांचे कौतुक केले. नवीन शैक्षणिक धोरण, ॲक्टिव्हीटी बेस लर्निंग, शैक्षणिक साधनांचा अध्यापनातील वापर, लेखन,वाचन, गणन या मूलभूत कौशल्यांसह व्यावहारिक चतुराई बरोबरच विद्यार्थ्यांच्या व्यक्त होण्यावर भर दिला. तसेच माजी विद्यार्थी संघ कार्यान्वित करण्यावर भर देऊन, या माध्यमातून शाळांचा कायापालट करण्याचे आवाहन पार्थमिक शिक्षणाधिकारी ललिता दहितुले यांनी केले.

यावेळी पंचायत समिती मुरुडचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी,कोर्लई ग्रामपंचायत सरपंच राजश्री मिसाळ, विस्तार अधिकारी महेश कवळे, विस्तार अधिकारी सुनील पाटील, केंद्रप्रमुख दिनेश म्हात्रे, निलेश वारगे, जंजिरा विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुधाकर दांडेकर, पांडुरंग आरेकर, उदय दांडेकर, अभय दिवेकर, सर एस ए हायस्कूलचे मुख्याध्यापक सरोज राणे, मुख्याध्यापक किशोर गंभे, जितेंद्र मकू, गालिब, अपेक्षा म्हात्रे यांच्यासह बालवैज्ञानिक, शिक्षक, पालक , विद्यार्थी आणि चिकणी, काशिद, सर्वे गावचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या दिमाखदार सोहळ्याचे सूत्रसंचालन राजेंद्र नाईक आणि जगदीश चवरकर यांनी केले.

# 'चौल-बेलोशी रस्त्याच्या संरक्षक भिंतीचे काम थांबवा'

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील चौल वावे बेलोशी रस्ताच्या सरंक्षक भिंती बांधकाम निकृष्ट दर्जाचे केले जात आहे. याची चौकशी करून करावाई करण्यात यावी अशी मागणी भारतीय जनता पार्टी अलिबाग तालुका दक्षिण अध्यक्ष अशोक वारगे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता यांच्याकडे पत्राव्दारे केली आहे.




चौल वावे बेलोशी रस्ता ३० मध्ये सरंक्षक भिंतीचे काम सुरू आहे. या ंरक्षक भिंतीमध्ये दगड व डबर टाकण्यात येत आहे. काम निकृष्ट दर्जाहे करण्यात येत आहे. हे काम तात्काळ थांबवून काम करणार्या ठेकेदारावर ताबडतोब कारवाई करावी . हे काम सुरू असताना सार्वजनिक बांधकाम विभागातील कोणताही अभियंता तिथे उपस्थित नसतो. त्यामुळे संबंधित अभियंत्यावर देखील कारवाई करावी, अशी मागणी अशोक वारगे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांकडे केली आहे.

पान १ वरुन

## शेकाप नेत्या चित्रलेखा पाटील यांच्याविरोधात शिवसेनेचे 'जोडे मारो'

चित्रलेखा पाटील यांच्या व्हिडिओ व्हायरल करण्याच्या कृतीचा निषेध नोंदविताना जिल्हा सहसंपर्कप्रमुख व माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, उपतालुकाप्रमुख शौकत तारलेकर, शहरप्रमुख सुरेश पवार, विभागप्रमुख लक्ष्मण मोरे, नगराध्यक्षा स्नेहा मेहता, युवासेना संपर्कप्रमुख विजय शेलार, विक्रम भिलारे, नगरसेवक विनायक दीक्षित, नागेश पवार, राजेश डांगे, दत्ता मोरे, सुनील तळेकर, अनिल दळवी, प्रसाद मोरे, प्रसाद पवार, गणेश येरूणकर, विभाग संघटिका गीता दळवी, उद्योजक रामदास कळंबे यांच्यासह शिवसैनिक, युवासैनिक व महिला आघाडी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवसेना पदाधिकाऱ्यांनी शेकापच्या नेत्या चित्रलेखा पाटील यांनी व्हायरल केलेल्या व्हिडिओबाबत तत्काळ कारवाई करण्याची मागणी या वेळी केली. शिवसेना नेते भरत शेठ गोगावले यांच्या बद्दल बदनामीकारक व्हिडिओ प्रसिद्ध केल्याबद्दल श्रीवर्धन मध्ये शिवसैनिक आक्रमक झाले होते. शिवसेनेचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते त्याचप्रमाणे महिला आघाडीचे कार्यकर्तेदेखील या आंदोलनामध्ये सहभागी झाल्या होत्या.

# प्राथमिक आरोग्य केंद्र खालापूर येथे ५० क्षयरुग्णांना पोषक आहार फूडचे वाटप



**अलिबाग :रामप्रहर वृत्त**

रिलायन्स हॉस्पिटल, लोढवली प्राथमिक आरोग्य केंद्र चौक ता.खालापूर यांच्या द्वारे निक्षय मित्र रिलायन्स कंपनी लि.पातळगंगा यांच्याकडून ५० क्षयरुग्णांना पोषक आहार फूड बास्केट दि.८ डिसेंबर रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र खालापूर येथे मान्यवरचा हस्ते वाटप करण्यात आले.

यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. इंगोले कल्याणी, रिलायन्स हॉस्पिटलचे डॉ. प्रणा बारडोई रिलायन्सचे डेयपुटी जनरल मॅनेजर विनोद तारेकर, मिलन लॅबोरेटीज इंडिया, प्रा. लि. चे सुलभा झेंडे. निखिल अवसरे, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. उषा राठोड, डॉ. अक्षयराज राठोड, डॉ.वैभवी निंबाळकर, डॉ. देशमुख डॉ. शहा, श्रीमती तारा बनसोडे कौंसलेर रिलायन्स हॉस्पिटल, महेंद्र पिंगळे आदि मान्यवर होते.

यावेळी टी. बी. मुक्त रायगड करण्यासाठी सर्व कॉर्पोरेट क्षेत्रातील कंपन्यानी या कार्यात योगदान द्यावे. जास्तीत जास्त कंपन्यांनी निक्षय मित्र बनावे, असे आवाहन जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. प्राची नेहूलकर यांनी केले आहे. यावेळी जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. प्राची नेहूलकर यांचा हस्ते कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमास उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे आभार समाधान धनवे यांनी मानले. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्र वावरे, लोहप, चौक, येथील आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

## कोयना क्षत्रिय मराठा समाज यांच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**चौक : प्रतिनिधी**

कोयना क्षत्रिय मराठा समाज सेवा संघ महाराष्ट्र राज्य यांच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन रविवारी १४ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता डोंबिवली येथे होणार आहे.कोयना क्षत्रिय मराठा समाज सेवा संघ हा रायगड, ठाणे,रत्नागिरी,पालघर,सातारा, नवी मुंबई,मुंबई, ठाणे येथे कार्यरत असून समाज उपयोगी कार्यक्रमाच्या माध्यमातून समाज एकसंघ ठेवण्याचे कार्य गेली ३० वर्ष करीत आहे.मराठी भाषा टिकावी, ती दृढ व्हावी यासाठी प्रथमच हस्तलिखित निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेतील विजेत्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.कोयना जननी दिनदर्शिका २०२६ चे प्रकाशन यावेळी समाजातील मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रम १४ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता

वक्रतुंड सभागृह, गणेश मंदिर, फडके रोड, डोंबिवली (पूर्व) येथे होणार आहे.

## 'शांतीवन'च्या अध्यक्ष रक्षाबेन मेहता यांचे निधन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



रक्षाबेन प्रभाकर मेहता अध्यक्ष कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन आणि गांधी स्मारक निधी मुंबई मनीभवनच्या ट्रस्टी यांच्या निधनाने समाजसेवेच्या विश्वातील एक आधारवड कोसळला आहे. वयाच्या ८९व्या वर्षी त्यांचे ६ डिसेंबर रोजी निधन झाले.

कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन, पनवेल यांच्या त्या खऱ्या अर्थाने मातृस्वरूप होत्या. कुष्ठरुग्ण बांधव, आदिवासी विद्यार्थी आणि संस्थेचे कार्यकर्ते या सगळ्यांसाठी त्या प्रेम, आधार आणि सुरक्षिततेचे छत्र होत्या. इनर्व्हील क्लबच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या फाउंडर मेंबर म्हणून त्यांचे योगदान हे सेवाभावाची तेजस्वी परंपरा निर्माण करणारे ठरले. रक्षाबेन मेहता यांच्या पश्चात फाल्गुनी मेहता, नीता मेहता, उमेश मेहता, निष्का मेहता, आदित्य वर्मन मेहता, सुकुमार मेहता, माला मेहता हे त्यांच्या परिवारातील सदस्य त्यांच्या समाजसेवेचे व्रत पुढे तेवत ठेवतील.

**दुखवटा**



## लक्ष्मण शिंदे

**मोहोपाडा:** रसायनी परिसरातील लक्ष्मण शिंदे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले त्यांचा अंत्यविधी पाताळेश्वर मंदिराजवळील स्मशानभुमी वर करण्यात आला. येथेच त्यांचा दशक्रिया विधीही होणार असुन उत्तरकार्य त्यांच्या खाने आंबिवली येथील राहत्या घरी होणार आहे.

## संपादकीय

# गारठा वाढला!

महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून थंडीची तीव्रता वाढत चालल्याचे चित्र आहे. अनेक शहरांमध्ये किमान तापमानात चार ते सहा अंशांनी घसरण झाली असून काही भागांनी या हंगामातील कडाक्याची थंडी अनुभवली आहे. पुणे, नाशिक, नागपूर, कोल्हापूर यांसारख्या ठिकाणी आठ–दहा अंश सेल्सियसपर्यंत खाली गेलेला पारा नोंदवला आहे. हवामान विभागाने काही भागात 'कोल्ड वेव्ह'चा इशारा दिला असून पुढील काही दिवसांत रात्रीचे तापमान आणखी खाली जाण्याची शक्यता वर्तवली आहे.

**सपाट निळ्या आकाशाखालील तो शीतल स्पर्श आता गंभीर होत चालला आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये तापमानाच्या किमान नोंदी महिन्याच्या आत कमी होताना दिसत आहेत महाराष्ट्रातील उत्तर, पश्चिम व विदर्भ भागात थंडीचे प्रमाण अधिक जाणवत आहे. पुण्यात किमान तापमान नऊ अंशांच्या आसपास, तर नाशिकमध्ये आठ–नऊ अंश सेल्सिअस इतके कमी तापमान नोंदले गेले. नागपूर आणि विदर्भातील जिल्ह्यांतही पारा आठ–दहा अंशांपर्यंत खाली घसरला आहे. थंडीमुळे सकाळी धुके, दुपारी गार वारे आणि संध्याकाळी अचानक वाढणारी थंड लाट असे तीन वेगवेगळे हवामान एकाच दिवशी अनुभवायला मिळत आहे. देशभरातही उत्तरेकडून येणारे थंड वारे मध्य भारतात सरकले असून राजस्थान, पंजाब, हरियाणा, दिल्ली, उत्तर प्रदेश या राज्यांतही तापमानात मोठी घसरण झाली आहे. त्या परिणामाचा फटका महाराष्ट्रालाही बसत आहे. थंडीमागील कारणे अनेक आहेत. उत्तर भारतातील सायबेरियन थंड वाऱ्यांचा प्रभाव उत्तर भागात निर्माण झालेला बर्फासमान वारा मध्य प्रदेश, महाराष्ट्राच्या पठारी भागात पोहचत असून तापमानात तीव्र घट होत आहे. हवामान बदलामुळे अस्थिर तापमान पॅटर्न गेल्या काही वर्षांत तापमानातील चढ–उतार वाढले आहेत. दिवस–रात्री तापमानातील फरक वाढणे, अचानक गारठा निर्माण होणे हे हवामान बदलाचे लक्षण मानले जाते. पावसाळ्यानंतरचा ओलसर हवेचा खेळ हळूहळू कोरडी हवा वाढत असून रात्रीची थंडी अधिक जाणवते. ढगाळ वातावरण नसल्यामुळे उष्णता धरून ठेवणारा थर नष्ट होतो आणि थंडी वाढते. याचा सामान्य जनजीवनावर परिणाम होतो. आरोग्याच्या समस्या वाढण्याची भीती श्वसनसंबंधित आजार, सर्दी–ताप, दमा, ब्रॉन्कायटिस, सांधेदुखी या आजारांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. वृद्ध, बालके आणि गर्भवती महिलांसाठी हा गारठा अधिक त्रासदायक ठरतो. शेतकरी आणि पशुपालकांसाठी आव्हान आहे. थंडीमुळे पिकांवर दवाचा धोका निर्माण होत आहे. पशुधनासाठी उबदार व्यवस्था करणे, पाण्याची उपलब्धता कायम ठेवणे या गोष्टी ग्रामीण भागासाठी महत्त्वाच्या ठरत आहेत. रोजंदारी आणि खुल्या जागेत काम करणाऱ्यांचे हाल होतात. विशेषत: बांधकाम कामगार, वाहतूक कामगार, रात्री ड्युटी करणारे कर्मचारी यांना थंडीचा मोठा फटका बसत आहे. अशा वेळी नागरिकांनी गरम कपड्यांचा वापर करावा, पहाटे आणि रात्री बाहेर जाण्याचे टाळावे. लहान मुले, वृद्ध अशांना उबदार ठेवावे. गरम पाण्याचे सेवन, पौष्टिक आहार, सूप/गरम पदार्थांचा समावेश करावा. महाराष्ट्रात पडणारी वाढती थंडी हा केवळ ऋतूचा बदल नाही; हवामानातील वाढती अनिश्चितता याचेही संकेत आहे. तापमानातील अशी तीव्र घसरण समाजातील सर्व घटकांवर परिणाम करते. त्यामुळे नागरिकांपासून प्रशासनापर्यंत सर्वांनी सजग राहणे आता या परिस्थितीत आवश्यक बनले आहे.**

# सर्व गावांचे २०० मीटर परिघीय क्षेत्र 'डीम्ड एनए'



महाराष्ट्र शासनाने सुधारणा केलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब केल्याने कोल्हापूर जिल्ह्यातील ३ लाख जमीन मालकांना थेट फायदा होणार आहे. कोल्हापूर जिल्ह्याच्या विकासाला नवी दिशा देणारा आणि सामान्य माणसाच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाला हात घालणारा एक ऐतिहासिक निर्णय कोल्हापूर जिल्हा प्रशासनाने प्रत्यक्षात आणला आहे. कोल्हापूर महसूल विभागाच्या धडक मोहिमेअंतर्गत राज्यातील पहिलाच प्रयोग राबवत कोल्हापूर जिल्ह्यातील तब्बल १,२०० गावांमधील ६० हजार गट नंबर (सर्व्हे नंबर) आता 'डीम्ड एनए' (मानीव अकृषिक) म्हणून घोषित करण्यात आले आहेत. सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबवलेल्या या मोहिमेमुळे ग्रामीण भागातील सुमारे ३ लाख नागरिकांना याचा थेट आणि तत्काळ फायदा मिळणार आहे. या निर्णयामुळे केवळ कागदपत्रांचा प्रवासच थांबला नाही, तर कोल्हापूरच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला आणि गृहनिर्माण क्षेत्राला मोठी गती मिळणार आहे.

**काय आहे हा ऐतिहासिक निर्णय?**

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२ आणि २०२२ च्या शासन परिपत्रकानुसार, गावठाणाच्या हद्दीपासून २०० मीटरच्या परिघीय क्षेत्रातील जमिनी अकृषिक समजल्या जाव्यात, असे स्पष्ट निर्देश होते. मात्र, त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली नव्हती. कोल्हापूर जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या जनहितकारी निर्णयाला मूर्त स्वरूप दिले. अवघ्या काही दिवसांत युद्धपातळीवर काम करून प्रशासनाने १,२०० गावांमधील गावठाणालगतच्या जमिनींचे सर्वेक्षण केले. यात रहिवासी, वाणिज्य आणि औद्योगिक वापरास योग्य असलेल्या २०० मीटरच्या परिघातील जमिनी निश्चित करून ६० हजार गट नंबरच्या याद्या तयार केल्या आहेत. या याद्या आता कोल्हापूर जिल्हयातील तहसीलदारांकडे सुपूर्द करण्यात आल्या आहेत.

**अर्ज न करता मिळणार सनद**

गावाकडच्या माणसाला घरासाठी किंवा व्यवसायासाठी आपली जमीन 'एनए' (अकृषिक) करायची म्हटले की, सरकारी कार्यालयांत येजा करावी लागत असत. नगररचना विभाग, महसूल विभाग आणि इतर अनेक विभागांचे 'ना हरकत दाखले' मिळवण्यात नागरिकांचा वेळ आणि पैसा वाया जात असे. मात्र, कोल्हापूर पॅटर्नने ही सर्व कटकट संपवली आहे.

आता नागरिकांना जमिनीच्या अकृषिक दर्जासाठी कोणत्याही कार्यालयात अर्ज करण्याची गरज नाही. नगररचना विभागाच्या स्वतंत्र अभिप्रायाची आवश्यकता नाही, की मोजणी शुल्क भरण्याची सक्ती नाही. प्रशासन स्वतःहून आपल्या दारी येणार आहे. तयार करण्यात आलेल्या यादीनुसार तलाठी गावोगावी नोटीस देऊन संबंधित जमीनधारकांना माहिती देतील. त्यानंतर तहसील कार्यालयामार्फत अकृषिक आकाराचे चलन पाठवले जाईल. जमीनधारकाने शासनाचा अकृषिक सारा आणि रूपांतरित कर भरला की, तहसीलदार तत्काळ 'अकृषिक सनद' प्रदान करतील. इतकी सुलभ आणि पारदर्शक प्रक्रिया राबवणारे कोल्हापूर हा राज्यातील पहिला जिल्हा ठरला आहे.

**गावस्तरावर होणारे दूरगामी आणि क्रांतिकारक फायदे**

या निर्णयाचा सर्वाधिक सकारात्मक परिणाम हा गावपातळीवर दिसून येणार आहे. 'डीम्ड एनए'च्या या निर्णयामुळे ग्रामीण भागाचे चित्र पालटणार आहे,

१. घरांचे स्वप्न होणार पूर्ण : ग्रामीण भागात गावठाणाबाहेर घर बांधताना कायदेशीर अडचणी येत होत्या. आता गावठाणापासून २०० मीटरच्या आतील जमिनी अधिकृतपणे अकृषिक झाल्यामुळे ग्रामस्थांना कायदेशीररीत्या पक्की घरे बांधता येतील. अनधिकृत बांधकामाचा शिक्का पुसला जाईल.

२. कर्ज मिळणे झाले सोपे : जोपर्यंत जमिनीला 'एनए'चा दर्जा मिळत नाही, तोपर्यंत बँका आणि वित्तीय संस्था गृहकर्ज किंवा व्यवसायासाठी कर्ज देत नाहीत. आता थेट अकृषिक सनद मिळणार असल्याने बँकांचे दरवाजे शेतकऱ्यांसाठी आणि ग्रामस्थांसाठी खुले होतील. यामुळे गावातच भांडवल उभे राहून विकासाला चालना मिळेल.

३. बांधकाम व्यवसायाला चालना : कर्ज उपलब्ध झाल्यामुळे आणि जमिनीची कागदपत्रे क्लियर झाल्यामुळे गावात नवीन बांधकामे सुरू होतील. यातून स्थानिक गवंडी, मजूर, हार्डवेअर विक्रेते आणि सिमेंट–लोखंड व्यापाऱ्यांना मोठा रोजगार मिळेल. एकप्रकारे ग्रामीण अर्थचक्राला यामुळे गती मिळणार आहे.

४. फसवणुकीला आळा आणि पारदर्शकता : अनेकदा जमिनीच्या व्यवहारात ती जमीन अकृषिक आहे की नाही, यावरून फसवणुकीचे प्रकार घडत असत. आता प्रशासनानेच अधिकृत याद्या जाहीर केल्यामुळे आणि मालमत्ता पत्रिकेवर तशा नोंदी होणार असल्याने जमिनीचे व्यवहार अत्यंत पारदर्शक होतील. खरेदी–विक्री करताना ग्राहकांची फसवणूक टळेल.

५. वेळ आणि पैशाची बचत : पूर्वी एनए ऑर्डर मिळवण्यासाठी एजंटची मध्यस्थी, कार्यालयात हेलपाटे मारणे यात सर्वसामान्यांचे लाखो रुपये खर्च होत. आता 'विना अर्ज' आणि 'विना शुल्क मोजणी' या तत्त्वामुळे शेतकऱ्यांच्या पैशाची मोठी बचत होणार आहे.

**प्रशासकीय गतिमानतेचे उत्तम उदाहरण**

सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी या प्रक्रियेबद्दल समाधान व्यक्त केले आहे. त्यांच्या हस्तेच संबंधित तालुक्यांच्या तहसीलदारांकडे याद्या सुपूर्द करण्यात आल्या आहेत. महसूल विभाग आणि भूमी अभिलेख विभागाने ज्या तत्परतेने हे काम पूर्ण केले, ते वाखाणण्याजोगे आहे. या मोहिमेमुळे कोल्हापूर जिल्ह्याच्या नियोजित विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे.

थोडक्यात सांगायचे तर, केवळ महसूल गोळा करणे हा या निर्णयाचा उद्देश नसून, सामान्य माणसाला सन्मानाने जगण्याचा हक्क देणे, हा यामागचा मूळ विचार आहे. कोल्हापूरकरांसाठी हा निर्णय खऱ्या अर्थाने आनंद देणारा ठरला असून, येत्या काळात कोल्हापूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात विकासाची नवी गंगा अवतरलेली दिसेल, यात शंका नाही. आता या शासनाच्या निर्णयाची कोल्हापूर जिल्ह्यातील अंमलबजावणी पथदर्शी काम म्हणून राज्यभर स्विकारली जाईल.

**–सचिन अडसूळ,**
जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर




# गुगल अकाउंट डिलीट करण्याच्या सोप्या स्टेप्स



कधीकधी काही कारणांमुळे आपले गुगल अकाउंट आपल्याला डिलीट करायचे असते, परंतु ते नेमके कसे करायचे हे समजत नाही. त्यासाठी या काही सोप्या स्टेप्सचा उपयोग करा. कोणत्याही कारणास्तव एखाद्या व्यक्तीला त्याचे गुगल अकाउंट डिलीट करायचे असल्यास काय बरं करावं हा प्रश्न पडलेला असतो. मग तुम्ही नवीन फोन घेतला असेल म्हणून आधीचे अकाउंट नकोय किंवा विनाकारण उघडलेले अकाउंट डिलीट करायचं असल्यास ते करणं फार सोपं आहे. परंतु, अकाउंट डिलीट करण्यासोबत काही महत्त्वाच्या गोष्टी तुम्हाला लक्षात ठेवणे गरजेचे आहे, ते कोणते ते पाहा.

**अकाउंट डिलीट करण्याचे तोटे**

एखादे गुगल अकाउंट कायमस्वरूपी डिलीट केल्यास, त्यासोबत तुमचे सर्व फोटो, इमेल्स, फाईल्स, कॅलेंडर यासोबतच आतापर्यंतचा सर्व डाटादेखील डिलीट होतो. जी–मेल, ड्राइव्ह, प्ले यांसारख्या सर्व सेवांचा तुम्ही उपयोग करू शकणार नाहीत. त्यासोबतच गुगलवर खरेदी केलेल्या गोष्टी जसे की सिनेमा, संगीत, प, गेम्स आणि टीव्ही कार्यक्रम या सर्व गोष्टीसुद्धा डिलीट होऊन जातील.

**रिव्ह्यू आणि डाऊनलोड**

एखादे अकाउंट डिलीट करण्यापूर्वी तुम्ही तुमचा सर्व डाटा एकदा तपासून आवश्यक वाटणारा डाटा डाऊनलोड करून घेऊ शकता. जर तुमचे जी–मेल अकाउंट ऑनलाइन बँकिंग, सोशल मीडिया आणि कोणत्याही प्ससोबत लिंक्ड असल्यास, तुमच्या अकाउंटमधील रिकव्हरी ई–मेलची माहिती भरून घ्यावी.

**अकाउंट डिलीट करणे**

गुगल अकाउंटमधील डाटा आणि प्रायव्हसी या सेक्शनपाशी यावे.

तेथे सर्वांत खाली 'युअर डाटा अँड प्रायव्हसी' हा पर्याय असेल, तो निवडावा.

तिथे गेल्यानंतर 'मोर' पर्याय क्लिक करून 'डिलीट युअर गुगल अकाउंट' हा पर्याय निवडावा.

त्यानंतर स्क्रीनवर येणाऱ्या सूचनांचे पालन करून आपले गुगल अकाउंट डिलीट करावे.एक गुगल अकाउंट डिलीट केल्याने त्याचा परिणाम इतर कोणत्याही अकाउंटवर होणार नाही हे लक्षात असूद्या..

# भाजपचे ज्येष्ठ नेते स्व. गोपीनाथ मुंडे



**निमित्त**

काहींना जन्मतःच वारसा मिळतो समृद्ध जीवनाचा. तर काही आपलं जीवन स्वतः घडवतात. गोपीनाथ मुंडे म्हणजे स्वकर्तुत्वाने घडलेला माणूस. राजकारणाचा कुठलाही वारसा नसताना राजकारणात शिखर गाठणारा अद्वितीय नेता. गोपीनाथ पांडुरंग मुंडे यांचा जन्म बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील नाथरा या गावी एक सामान्य शेतकरी कुटूंबात १२ डिसेंबर १९४९ रोजी झाला.

वडील पांडुरंग मुंडे आणि आई लिंबाबाई मुंडे हे वारकरी होते. आई वडिलांसोबत मुंडे साहेबांनी वयाच्या १४व्या वर्षी पंढरपूरची पाई वारी केली. त्यामुळे मुंडेसाहेबांवर बालपणापासूनच अध्यात्मिक प्रभाव राहिला. त्यांची घरची परिस्थिती बेताची होती. १९६९ मध्ये त्यांचे पितृछत्र हरपले; त्यानंतर त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी आई आणि मोठे बंधू पंडितआण्णा यांनी उचलली. भाऊ पंडित अण्णा यांनी स्वतःचे शिक्षण सोडून गोपीनाथ मुंडे यांचे शिक्षण पूर्ण केले. मुंडे साहेब शालेय जीवनात खुप हुशार नव्हते. पण शिक्षणाचं महत्त्व त्यांनी ओळखलं म्हणून, शालेय शिक्षणानंतर उच्च शिक्षणासाठी त्यांनी अंबाजोगाई जवळ केली.

गोपीनाथ मुंडे यांच्या राजकीय प्रवासाला सुरवात झाली ती महाविद्यालयीन जीवनात, महाविद्यालयात होणाऱ्या अंतर्गत निवडणुकांमध्ये मुंडे साहेब नेहमीच किंग मेकर ठरायचे, अंबाजोगाईत शिक्षण घेत असताना त्यांची भेट झाली ती प्रमोद महाजन यांच्याशी त्यांनी मुंडे साहेबांचे विद्यार्थी दिशेतील नेतृत्व करण्याचे गुण ओळखले त्यांनाअखिल भारतीय विद्यार्थी परिषदेत काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली.

मुंडे साहेबांनी त्यांच्या दिलदार स्वभावामुळे अनेक मित्र जोडले. विलासराव देशमुख यांच्याशी त्यांची असलेली मैत्री राजकारणात चर्चेचा विषय होता. विलासराव देशमुख काँग्रेसचे आणि मुंडे साहेब भाजपचे तरीही त्यांच्यात मतभेद कधी आला नाही. ते दोघेही विधानभवनापर्यंत एका गाडीने प्रवास करायचे. त्यानंतर साताऱ्याचे छत्रपती उदयनराजे भोसले यांच्याशी मुंडे साहेबांचे खुप स्नेह होते. राजू शेट्टी साहेब आणि मुंडे साहेब यांचे नेहमीच एका रथाचे दोन चाके असल्यागत होते. साहेब म्हणायचे राजू शेट्टी साहेब तुम्ही ऊस उत्पादक शेतकऱ्यांची भूमिका घ्या मी ऊस तोडणाऱ्या मजुरांची भूमिका घेतो. त्यामुळे तर मुंडे आणि शेट्टी हे मैत्रीचं नात अगदी घट्ट झाले होते. पक्षीय चौकटीबाहेर आपली मैत्री जपली म्हणून साहेब सत्तेत नसले तरी मतदारसंघातील विकासकामे कधी थांबली नाहीत.

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत मुंडे साहेबांनी महाराष्ट्र पिंजून काढलं,देशात भाजपची सत्ता आली पाहिजे हा एकच ध्यास डोळ्यासमोर ठेवून त्यांनी दांडगा प्रचार केला, २०१४च्या लोकसभा निवडणुकीत मोठा विजय मिळवला व राज्यात महायुतीचे ४२ खासदार निवडून आले, व देशात केंद्रीय ग्रामविकास मंत्री असे महत्त्वाच खात मिळाले. इतकी वर्षे सत्तेत येण्यासाठी साहेबांनी संघर्ष केला परंतु सत्तेत आल्यावर मुंडे साहेबांना सत्तेची फळे मात्र चाखता आली नाहीत.

३जून २०१४च्या पहाटे दिल्ली विमानतळाकडे जात असताना त्यांच्या गाडीला एका टॅक्सीने जोरात धडक दिली. त्याच वेळी त्यांना आलेल्या हृदयविकाराच्या झटक्यांन त्यांचं निधन झाले .

**साभार – इंटरनेट**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यामध्ये कमी पाणी पिणे आरोग्यासाठी घातक

सध्या थंडीचे दिवस सुरू आहेत. थंडीच्या या दिवसांमध्ये अनेक आजार निर्माण होत असतात. मग ताप, थंडी, सर्दी, खोकला असे अनेक आजार निर्माण होताना दिसतात. त्यात थंडीच्या दिवसात लोक जास्त पाणी पित नाहीत. कारण हिवाळ्यामध्ये जास्त तहान लागत नाही. त्यामुळे लोकं फार कमी पाणी पितात. मग कमी पाणी पिल्यामुळे त्याचे आपल्या शरीरावर दुष्परिणाम दिसतात. मग लोकांना अनेक गंभीर आजारांचा सामना करावा लागतो.



किडनीवर वाईट परिणाम– जर तुम्ही थंडीच्या दिवसांमध्ये कमी पाणी पिलं तर त्याचा तुमच्या किडनीवर वाईट परिणाम होतो. किडनीवर कोणताही परिणाम होऊ द्यायचा नसेल तर भरपूर पाणी पिणे गरजेचे आहे. शरीरात पाण्याची कमतरता असेल तर किडनीवर दबाव येतो, त्यामुळे युरिनरी ट्रॅक्ट इन्फेक्शन किंवा ट्रॅकमध्ये जळजळ अशा समस्या निर्माण होतात. त्यामुळे थंडीच्या दिवसांमध्ये तहान जरी लागली नाही तरी भरपूर पाणी पिणे गरजेचे आहे.

अशक्तपणा येतो – थंडीच्या दिवसांमध्ये कमी पाणी पिले तर शरीरात अशक्तपणा निर्माण होतो. पाण्याच्या कमतरतामुळे आपले शरीर कमजोर होते त्यामुळे आपल्या शरीरातील रक्ताची, ऑक्सिजनची कमतरता भासते. मग आपल्याला थकवा येतो अशक्तपणा येतो. त्यामुळे प्रत्येकाने भरपूर पाणी पिणे गरजेचे आहे.

पोटाशी संबंधित आजार – शरीरात पाण्याची कमतरता असेल तर त्याचा परिणाम आपल्या पोटावर होतो. मग बद्धकोष्ठतापासून ते अन्नपचनाशी संबंधित अनेक समस्या निर्माण होतात. तर अशा गंभीर समस्यांचा सामना करायचा नसेल तर भरपूर पाणी पिणे गरजेचे आहे.

त्वचा निस्तेज होते – शरीरात पाण्याची कमतरता असेल तर आपले शरीर हायड्रेट राहत नाही. तसेच शरीरातील पाण्याच्या कमतरतेमुळे आपली त्वचा निस्तेज होते म्हणजेच आपली त्वचा कोरडी पडते. त्यामुळे जर तुम्हाला तुमची त्वचा कोरडी पडू द्यायची नसेल आणि दिवसभर ओलसर ठेवायची असेल तर दररोज पाच ते सात ग्लास पाणी पिणे आवश्यक आहे यामुळे आपली त्वचा निरोगी आणि चमकदार राहते.

थंडीच्या दिवसांमध्ये निरोगी राहायचे असेल तर भरपूर पाणी पिणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रत्येकाने तीन ते चार लिटर पाणी पिणे खूप गरजेचे आहे.

# सिनारमाससाठी शापूरमध्ये कांदळवनांची कत्तल करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा

## भाजपच्या पल्लवी पाटील यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

सिनारमास प्रकल्पासाठी पोहोच रस्ता तयार करण्याच्या नावाखाली अलिबाग तालुक्यातील शहापूर परिसरातील कांदळवनांची बेकायदेशीर कत्तल करून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशालाच सरळ आव्हान दिल्याचा आरोप, भाजपा नेत्या पल्लवी पाटील यांनी केला आहे.



पल्लवी पाटील यांनी जिल्हाधिकारी किशन जावळे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले व तात्काळ कारवाई करून गुन्हेर दाखल करण्याची मागणी केली. त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांना देखील आपल्या मागणीचे निवेदन दिले.

एमआयडीसी अधिकारी व कंत्राटदारांवर गुन्हे दाखल करा. नुकसान झालेल्या कांदळवनांचा वैज्ञानिक पंचनामा करून पर्यावरणीय हानीचा अहवाल जाहीर करावा. शेतकऱ्यांची तक्रार न घेणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. जोपर्यंत मागण्या पूर्ण होत नाही तोपर्यंत कंपनीच्या कामांना स्थगिती देण्यात यावी, आशा मागण्या करण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांच्या हक्कांवर आणि पर्यावरणावर असा खुलेआम आघात होत असेल तर आम्ही शांत बसणार नाही. दोषींवर कठोर कारवाई झाल्याशिवाय न्याय मिळणार नाही, यासाठी न्यायालयीन लढाई लढण्यास आम्ही तयार आहोत, असा इशारा पल्लवी पाटील यांनी दिला आहे.

सदरची घटना १५ नोव्हेंबर २०२५ रोजी घडली आहे.सर्वे नंबर ५९६/अ मध्ये झालेला हा विध्वंस स्थानिकांच्या निदर्शनास आल्यानंतर शेतकऱ्यांनी पोलिसांकडे धाव घेतली, मात्र पोयनाड पोलीस ठाण्याने लेखी तक्रार घेण्यास नकार दिल्याचा, तसेच वनविभागाकडे देखील तक्रार दाखल करूनही अद्यापही त्याच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, असा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे. हा प्रकार कायद्याच्या राज्यालाच काळिमा फासणारा असून प्रशासनाने जाणूनबुजून लोकांचा विरोध दाबल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

कांदळवन हे सर्वोच्च न्यायालयाने संरक्षित क्षेत्र जाहीर केले असून त्यांचे संरक्षण करणे ही राज्य यंत्रणेची कायदेशीर जबाबदारी आहे. अशा परिस्थितीत एमआयडीसीने आम्हीच कायदा या भूमिकेत राहत पर्यावरणाचा उघड विध्वंस केल्याने स्थानिक परिसंस्थेला अपरिवर्तनीय हानी झाली आहे. या संदर्भात न्याय मिळत नसल्याचे लक्षात आल्यावर आम्हाला थेट जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांच्याकडे न्याय मागण्याची वेळ आली असल्याचे त्यांनी नमूद केले.

# कोशिंबळे गावात प्लास्टिक मुक्त स्वच्छता अभियान यशस्वी

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील कोशिंबळे/तळे कोशिंबळे गावात ग्रामविकास कमिटी व महिला मंडळाच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या प्लास्टिक मुक्त गाव अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संपूर्ण गावात विखुरलेला प्लॅस्टिक व इतर कचरा गोळा करून स्वच्छतेचा मोठा उपक्रम राबविण्यात आला. या मोहिमेमुळे गावाचा परिसर स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त बनला असून सर्वच स्तरातून या उपक्रमाचे भरभरून कौतुक होत आहे.

या उपक्रमाच्या यशस्वीतेत समाजसेवक विजय दादा यांचे मार्गदर्शनाखाली ग्रामविकास कमिटीतील कार्यकर्त्यांनी घराघरातून, सार्वजनिक जागांमधून तसेच रस्त्याच्या कडेला टाकलेला प्लॅस्टिक कचरा गोळा करण्याचे काम वेगाने पूर्ण केले.

यावेळी यशवंत बक्कम, बापू बक्कम, सुभाष शिंदे, प्रदीप बक्कम यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत संपूर्ण उपक्रमात कृतिशील सहभाग नोंदवला. गावातील सर्व महिला मंडळांनी मोठ्या उत्साहाने या स्वच्छता मोहिमेत भाग घेतला. महिलांच्या सहभागामुळे अभियानाला अधिक बळ मिळाले आणि गावामध्ये पर्यावरण संरक्षणाबाबत जागरूकता निर्माण झाली.

स्वच्छता मोहिमेअंती प्लॅस्टिकमुक्त गावाची संकल्पना प्रत्यक्षात उतरल्याने नागरिक आनंदित झाले असून गावकऱ्यांकडून आणि परिसरातील सामाजिक मंडळांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या उपक्रमामुळे 'स्वच्छ गाव – सुंदर गाव' या संकल्पनेला नवी ऊर्जा मिळाली आहे.

ग्रामविकास कमिटीने पुढील काळातही अशाच उपयुक्त उपक्रमांद्वारे गावाच्या पर्यावरण रक्षणासाठी प्रयत्न सुरू ठेवण्याचे आश्वासन दिले आहे.



महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक कोकण विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, नोहेंबर २७–डिसेंबर ३, २०२५/ अग्रहायण ६–१२, शके १९४७ १७

## उप विभागीय अधिकारी अलिबाग, उप विभाग अलिबाग, यांजकडून अधिसूचना

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये.**

क्रमांक उविअ/कात–२/भूसं./रामराज/एस.आर.०७/२०२४. ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ–२, दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश ''उक्त अधिसूचना'' असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड–अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखादया जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता भूमीसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, **रायगड** जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची–एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आला आहे). मौजे रोमराज, ता. अलिबाग येथील जमीन सांबरकुंड मध्यम प्रकल्पाचे पर्यायी रस्ता या सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त ''सार्वजनिक प्रयोजन'' असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे. असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची–दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची–तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत);

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची–चार मध्ये दिलेला आहे. तसेच **महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण भाग चार–अ, दिनांक ऑक्टोबर ७, २०२५ अन्वये भूमी संपादन, पुनर्वसन व पुर्नवसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १० क द्वारे महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्फत लोकहितास्तव उक्त अधिनियमाच्या प्रकरण–दोनच्या आणि प्रकरण–तीनच्या तरतूदी लागू करण्यापासून उक्त प्रकल्पाला सूट देण्यात आलेली आहे. (सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास).

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट–कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची–पाचमध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनाकांपासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण–चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाहीं:

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे हेतुपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश ''उक्त नियम'' असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) व्दारे विहित केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्यासाठी त्यांचेकडील आदेश क्रमांक भुसं/टे–६/१९१९१४९/मौजे रामराज/२०२५, दिनांक ३० मे २०२५ अन्वये **उप विभागीय अधिकारी, अलिबाग, उप विभाग अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड** यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची–एक**

**जमिनीचे वर्णन**

**गावाचे नाव :– मौजे रामराज, ता. अलिबाग, जि. रायगड**

| अ.क्र. (१) | स.नं./हि.नं./गट नंबर (२) | आवश्यक जमिनीचे आदमासे क्षेत्र (हे. आर.) (३) |
|---|---|---|
| १ | १०६ पै | ०.३६.०० |
| २ | ११० पै | ०.३९.०० |
| ३ | ११२ पै | १.१४.०० |
| ४ | ११५ पै | ०–०६.५० |
| | एकूण क्षेत्र | १.९५.५० |

**अनुसूची–दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नाव : मौजे रामराज, ता. अलिबाग येथील जमीन सांबरकुंड मध्यम प्रकल्पाचे पर्यायी रस्त्याकरिता संपादन.

प्रकल्पकार्याचे वर्णन : मौजे रामराज, ता. अलिबाग येथील जमीन सांबरकुंड मध्यम प्रकल्पाचे पर्यायी रस्त्याकरिता संपादन करण्यात येणारी जमीन रामराज गावठाणाच्या हद्दीत येत आहे. प्रस्तावित भूसंपादनाच्या जमिनीशेजारी नवघरे गावातील ८० ते १०० घरांची वस्ती आहे. प्रकल्पाचा पोहोच रस्ता पुनर्वसन गावठाणाला लागून आहे. तसेच सांबरकुंड नदीच्या वरील बाजूने जात आहे.

समाजाला मिळणारे लाभ : अलिबाग शहराचे औद्योगिक महत्त्व वाढते नागरीकरण व वाढते पर्यटन यांचे महत्त्व विचारात घेता येत्या दशकात अलिबाग शहराचा विकास आणि विस्तार वेगाने होईल. वाढत्या शहरीकरणाच्या दृष्टीने पिण्याचे पाणी उपलब्ध करणे, तसेच अलिबाग तालुक्यातील ३३ गावांमधील २५२८ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येण्यास मदत होईल. सांबरकुंड धरणामुळे पूर नियंत्रणाचा प्रश्न मार्गी लागेल. लोकांच्या मते (१) पोहोच रस्त्यामुळे पुनर्वसन गावठाणात राहणाऱ्या नागरीकांची जाण्यायेण्याचे सोय होणे (२) नागरीकांना पिण्याच्या पाण्याची सोय करणे, (३) प्रकल्पामुळे सिंचन निर्मिती होणे (४) औद्योगिकरणामुळे रोजगार निर्मिती होणे (५) धरणामुळे पूर नियंत्रणाचा प्रश्न मागी लागणे.
(आर्थिक रोजगार, पायाभूत सुविधा, सोयीसुविधा व इतर लाभांसंदर्भात)

**अनुसूची–तीन**

बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे : निरंक

**अनुसूची–चर**

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश : अलिबाग शहराचे औद्योगिक महत्त्व, वाढते नागरीकरण व पर्यटन यांचे वाढते महत्त्व लक्षात घेता, येत्या दशकात अलिबाग शहराचा विकास आणि विस्तार वेगाने होईल. वाढत्या शहरीकरणाच्या दृष्टीने पिण्याचे पाणी उपलब्ध करणे, तसेच अलिबाग तालुक्यातील ३३ गावांमधील २५२८ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येण्यास मदत होईल. सांबरकुंड धरणामुळे पूर नियंत्रणाचा प्रश्न मार्गी लागेल. या प्रकल्पाच्या प्रस्तावित खाजगी जमिनीचे भूसंपादनाकरिता सामाजिक परिणाम निर्धारणामधील उक्त अधिनियमाच्या कलम १०क द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत महाराष्ट्र शासन याद्वारे लोकहितास्तव उक्त अधिनियमाच्या प्रकरण–दोन आणि तीनच्या तरतुदी लागू करण्यापासून शासनाच्या एसआयए–२०२४/प्र.क्र.३१८/अ–२, दिनांक ९ ऑक्टोबर २०२५ अन्वये उक्त प्रकल्पाचे भूसंपादन करण्याकरिता सूट प्राप्त झालेली आहे. तरी सदरची भूसंपादन प्रक्रिया लवकरात लवकर सुरु करावी.

**अनुसूची–पाच**

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा : निरंक

(टीप. उक्त जमिनीच्या आराखड्याचे **उप विभागीय अधिकारी, अलिबाग, उप विभाग अलिबाग** यांचे कार्यालयमध्ये निरीक्षण करता येईल.)

**सही/–**
**मुकेश चव्हाण,**
**उप विभागीय अधिकारी, अलिबाग,**
**उप विभाग अलिबाग.**

**ठिकाण अलिबाग,**
**दिनांक २१ नोव्हेंबर २०२५.**

**क्र.जिमाका/राअ/जाहि/३०८/२०२५–२०२६**

# जमीन विक्रीच्या बहाण्याने फसवणूक

## मजूर ठेकेदाराला तिघांनी घातला लाखोंचा गंडा | पोलिसांत गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील त्रिकुटाने चेरवली येथील ६० गुंठे जमीन विक्री करण्याच्या बहाण्याने कोपरखैरणेती रमेश वेटा (वय ६९) या मजूर ठेकेदाराला ९२ लाख ७३ हजारांचा गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. भीमराव राठोड, वासुदेव लाड व बाळाराम लाड अशी त्रिकुटाची नावे असून, पनवेल शहर पोलिसांनी त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

रमेश वेटा यांची नोव्हेंबर २०११ मध्ये भीमराव राठोड याच्याशी ओळख झाली होती. दरम्यान, राठोड याने त्याच्या मालकीची चेरवली येथे ६० गुंठे जमीन असल्याचे सांगून ती प्रती गुंठा एक लाख रुपयांप्रमाणे ६० लाख रुपयांमध्ये विकत घेण्यास सांगितले होते. त्या वेळी राठोड याने खोटे व बनावट सातबारा उतारे दाखवून जमीन त्याच्या नावावर असल्याचे भासवले होते. त्यामुळे रमेश वेटा यांनी जमीन खरेदीसाठी राठोड याला पैसे देण्यास सुरुवात केली. मार्च २०१२ मध्ये पनवेल येथील दुय्यम निबंधक कार्यालयात या जमीन खरेदी-विक्री व्यवहाराची नोंदणीही करण्यात आली. एवढेच नव्हेतर राठोड याने २०१२ चे बनावट सातबारा दाखले ही रमेश वेटा यांना सादर केले. त्यामुळे त्यांनी राठोड याला ५३ लाख ८० हजार रुपयांची रक्कम धनादेशद्वारे दिली, मात्र मे २०१२ मध्ये ही जमीन राठोड यांच्या नावावर नसून त्याचे मूळ मालक वासुदेव आणि बाळाराम विठ्ठल लाड हे दोघे असल्याचे वेटा यांना समजले.




यानंतर लाड यांनीदेखील त्यांच्या नावे असलेल्या जमीन व्यवहारात अडथळा निर्माण करणार नसल्याचे सांगून वेटा यांच्याकडे २० लाखांची मागणी केली. त्यावर वेटा यांनी दबावाखाली रोख व चेकद्वारे लाड यांना २० लाख रुपये दिले. त्यानंतर या तिघांनी संगनमत करून रमेश वेटा यांच्या नावावर जमीन न करता जून २०१४ मध्ये राठोड यांच्या नावावर करून घेतली. त्यानंतर जमीन किंवा पैसे देण्यास टाळाटाळ करू लागल्याने अखेर वेटा यांनी या तिघांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# उरण राजपाल नाका येथे घराला आग

## शॉर्ट सर्किटमुळे आग; सुदैवाने जीवितहानी टळली



**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर, बातमीदार**

उरण शहरातील राजपाल नाका येथे गुरुवारी दुपारी ४:१५ च्या सुमारास गुलजार भाटकर यांच्या घरास अचानकपणे आग लागली. आग कशामुळे लागली याचे नेमकी कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. सुदैवाने यात कोणतेही जीवितहानी झाली नाही, अशी माहिती उरण पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलांनी यांनी दिली.

या आगीवर सिडको अग्नीशमन यंत्रणाच्या फायर ब्रिगेडने नियंत्रण मिळवले असून सिडको अग्निशमन यंत्रणेचे अधिकारी कर्मचारी यांनी घटना स्थळी युद्ध जन्य परिस्थितीत आगीवर नियंत्रण मिळविले.

सिडको अग्निशमन यंत्रणा व पोलीस प्रशासन व रिक्षा चालकांच्या सावधानतेमुळे अनुचित प्रकार टळला आहे. आग लागलेल्या घरात एकूण तीन मुली होत्या. आग लागल्याचे लक्षात येताच तीन मुलींनी दुसऱ्या मजल्या वरून खाली उडी मारली. रिक्षा चालकांनी या तीन मुलींचे जीव वाचविले. आग मोठी असल्यामुळे खूप मोठ्या प्रमाणात धूर सर्वत्र पसरले होते. दुसऱ्या मजल्यावर असलेले गुलजार भाटकर यांचे जुने घर जळून खाक झाले आहे.

तळ मजल्या वर अशोक राजपाल यांचे इलेक्ट्रिक सामानाचे गोडावून होते. त्यात शॉर्ट सर्किट होऊन आग लागल्याचे काही नागरिकांचे म्हणणे आहे. नेमकी आग कशामुळे लागली याचे नेमके कारण समजू शकले नाही. पोलीस प्राथमिक चौकशी करीत आहेत. आगीच्या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. उरण मध्ये आगीच्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होत असून नागरिकांनी खबरदारी घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

# वीर वाजेकर महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी प्रदर्शन व कार्यशाळा



**उरण : वार्ताहर, बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजे कर आज कॉमर्स कॉलेज मालन विभाग फुंडेच्या स्कूल कनेक्ट उपक्रम अंतर्गत प्राणिशास्त्र विभागाने शाळकरी विद्यार्थ्यांसाठी आकर्षक प्राणी नमुना प्रदर्शनाचे आयोजन केले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना प्राणिवैविध्याच्या अद्भुत जगाचा प्रत्यक्ष अनुभव देणे हा होता.

प्रदर्शनामध्ये प्राणीशास्त्राकडे उपलब्ध असलेले विविध संरक्षित प्राणि नमुने ठेवण्यात आले होते, लेखी माहिती व डॉ धरती घरत यांनी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन ज्यामध्ये प्राण्यांची शारीरिक वैशिष्ट्ये, बाह्य रचना आणि विविध प्राणी गट ओळखण्यासाठी उपयोगी ठरणारी प्रमुख लक्षणे यांची सविस्तर माहिती दिली.

भागुबाई चांगू ठाकुर विद्यालय, द्रोणागिरी तसेच तुकाराम हरी वाजेकर हायस्कूल, फुंडे येथील सुमारे २५० विद्यार्थ्यांनी ह्या प्रदर्शन भेट दिली. प्राणिशास्त्र विभागातील प्राध्यापक आणि विद्यार्थी स्वयंसेवकांनी शाळकरी मुलांना प्रत्येक विभागातून मार्गदर्शन केले आणि प्राण्यांच्या जतन केलेल्या नमुन्यांचे निरीक्षण वैज्ञानिक दृष्ट्या किती महत्त्वाचे आहे हे स्पष्ट केले.

विविध नमुने पाहताना विद्यार्थ्यांनी कुतूहल आणि आनंद व्यक्त केला. प्र. प्राचार्य व प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. आमोद ठक्कर यांनी प्राण्यांचे वर्गीकरणाचे महत्त्व व ते लक्षात ठेवण्यासाठीच्या सोप्या पद्धती चे मार्गदर्शन केले. पुढे असे नमूद केले की अशा सहभागात्मक शैक्षणिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होतो आणि जीवनशास्त्राविषयी रस निर्माण होतो.

कार्यक्रमाची सांगता सहभागी शाळांचे प्राचार्य व यशस्वितेसाठी सर्वांनी केलेल्या प्रयत्नांबद्दल कृतज्ञता व्यक्त करून झाली. हे प्रदर्शन विद्यार्थ्यांसाठी एक समृद्ध आणि अर्थपूर्ण शैक्षणिक अनुभव ठरले.

# वडगाव शाळेत आरोग्य तपासणी



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा शासकीय रुग्णालय,अलिबागच्या परिचर्या प्रशिक्षण केंद्र अलिबाग येथील ANM व GNM च्या विद्यार्थिनींचे ग्रामीण आरोग्य अनुभव शिबिर रसायनी पाताळगंगा येथील लोहोप आरोग्य उपकेंद्रात सुरू आहे. या कार्यक्रमांतर्गत रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, वडगाव येथे शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी, BMIS व आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यात आले.

यात आरोग्य विषयक चांगल्या सवयी, घ्यावयाची काळजी तसेच किशोरवयीन मुले यांना मार्गदशन,किशोरवयीन मुलींना स्वच्छता व शारीरिक बदल तसेच घयाव्याची दक्षता व मासिक पाळी व्यवस्थापन विषयी मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाकरीता जिल्हा रुग्णालय रायगड, अलिबागच्या अधिसेविका गायत्री म्हात्रे व परिचर्या प्रशिक्षण केंद्र जिल्हा रुग्णालय रायगड, अलिबागच्या परिचर्या अधिकारी सारिका पाटील यांचे मार्गदर्शन मिळाले.

कार्यक्रमाकरिता धनश्री पाटील, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुख्याध्यापक सुभाष राठोड व इतर शिक्षक, विद्यार्थी, पालक, जी.एन. एम. तृतीय वर्ष विद्यार्थिनी परिचारिका उपस्थित होत्या. संचालन शिक्षक वैजनाथ जाधव यांनी केले. प्रास्ताविक राठोड तर आभार धायगुडे यांनी मानले.

# युईएस कॉलेजमध्ये एड्सविषयी जनजागृती सत्र



**उरण : वार्ताहर**

युईएस कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अॅण्ड टेक्नॉलॉजीच्या राष्ट्रीय सेवा योजना तसेच रेड रिबन क्लब आणि इंदिरा गांधी हॉस्पिटल, उरण यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि. ९) एड्सविषयी जन जागृती सत्राचे आयोजन केले होते.

ह्या कार्यक्रमाला इंदिरा गांधी हॉस्पिटलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बाबासो कोडेल, सल्लागार महादेव पवार, लॅब टेक्निशियन तृप्ती परजणे, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख, शिक्षकवर्ग व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

इंदिरा गांधी हॉस्पिटलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बाबासो कोडेल यांनी एड्सविषयी माहिती तसेच समुपदेश व तपासणी कशी होते ह्याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच हॉस्पिटलतर्फे मोफत एड्सची तपासणी करून घेऊ शकतात, असे सांगितले.

# केवाळे हायस्कूल वार्षिक क्रीडा स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सुधागड एज्यूकेशन सोसायटी पालीचे माध्यमिक विद्यालय केवाळे, विद्यासंकुला मध्ये ९ डिसेंबर रोजी सशालेय वार्षिक क्रीडा स्पर्धे चे आयोजन करण्यात आले. विदयार्थ्यांच्या शैक्षणिक व शारीरीक ज्ञानात भर होण्यासाठी, तसेच विध्यार्थ्यांचे सात्विक गुणांना वाव आणि मनोबल वाढवण्याच्या दृष्टीने या क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या क्रीडा स्पर्धेचे आयोजन शाळेचे मुख्यध्यापक ढोले यांनी केले. त्या प्रसंगी स्थानिक स्कुल कमिटीचे चेअरमन / सदस्य मिलन पालकर, योगेश माळी, कृष्णा गायकर, मोहन माळी आदी उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे हारपुष्पाने पूजन करून तसेच शाळेचे संस्थापक शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये व अध्यक्ष वसंत वोसवाल यांच्या प्रतिमेचे पूजन करून क्रीडा स्पर्धेला सुरुवात केली.

शाळेतील शिक्षक अनंत गायकर, दिपाली म्हात्रे, मनुजा म्हात्रे, अस्मिता पालकर, सुरेखा शेंडे, पूजा म्हस्के, हेमा गायकर सहशिक्षक व लेखनिख प्रेसित पवार, केशव माळी, अमोल पालकर व शाळेतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. आलेल्या पाहुण्यांनी स्वतः क्रिडांगणात विध्यार्थीत मिसळून सहभाग दाखवला.

# मानवी हक्क दिनानिमित्त पोलिसांनी साधला शोलय विद्यार्थ्यांशी संवाद

**नवी मुंबई : बातमीदार**

तुर्भे पोलीस स्टेशन हद्दीत दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्रमांक १११, तुर्भे स्टोअर येथे विद्यार्थी/विद्यार्थिनी व शिक्षकांना मानवी हक्क दिनानिमित्त समाजातील तळागाळातील जनतेला मानवी हक्काचे ज्ञान माहिती होणे व त्याबाबत जनजागृती करिता कार्यक्रम साजरा करण्यात आला.



या वेळी तुर्भे पोलीस स्टेशन कडील पोलीस निरीक्षक गजानन कदम यांनी मानवी हक्क, पोलीस दलाची माहिती, सायबर सुरक्षा व गुन्हे प्रतिबंध, व्यसन मुक्ती व अंमली पदार्थ प्रतिबंध, आर्थिक फसवणूक व प्रतिबंधक उपाय, जेष्ठ नागरिक सुरक्षा व काळजी, मुली, महिला व बालकाची सुरक्षा, महिलांच्या विरोधातील घटना विषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

नवी मुंबई पोलीस व्हॉट्सअप चॅनेल फॉलो करण्यास सांगितले व नागरिकांचे पोलीस मदतीसाठी डायल ११२ व सायबर फ्रॉड हेल्पलाईन १९३० क्रमांकाची माहिती देऊन त्याचा प्रसार नागरिकामध्ये करावा. कार्यक्रम आबासाहेब पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तुर्भे पोलीस स्टेशन यांच्या आदेशाने सदर शाळेमध्ये आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमास नमूद शाळेमधील सुमारे ९० विद्यार्थी, शिक्षक, तुर्भे पोलीस स्टेशन गोपनीय विभागाचे प्रताप दरगुडे हे सदर कार्यक्रमास उपस्थित होते, अशी माहिती पोलीस अरुण थोरात यांनी दिली आहे.

# उत्तराखंड राज्य रजत जयंती महोत्सव

**कलंबोली : रामप्रहर वृत्त**

कलंबोली येथे रविवारी भव्य उत्साहात उत्तराखंड राज्य रजत जयंती महोत्सव साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला उत्तराखंडी प्रवासी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढवली.

या भव्य महोत्सवाचे आयोजन बद्री-केदार चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष व सरचिटणीस दिलीप बिष्ट यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. लोकगायक राकेश खन्वाल यांची उपस्थिती विशेष आकर्षण ठरली.

कार्यक्रमाला भाजप कळंबोली अध्यक्ष अमर पाटील, जिल्हा चिटणीस रवी पाटील, नगरसेवक रवी भगत, राजू शर्मा, जिल्हा अध्यक्ष (भा.वी.आ) बबन बरगजे, अशोक मोटे, उपाध्यक्ष संदीप भगत, विनोद बोरसे, मनोरंजन सिंग, नगरसेविका प्रमिला पाटील, मोनिका महानवर, सरस्वती कथारे, मनीषा निकम, चिटणीस निलेश भोईर, सुनीता हिरावले, घनश्याम शर्मा, राजेश पांडे, दुर्गा साहनी, अपरणा सरोज, रेणुका जाधव, दीपक दुदवडे, दत्तात्रय अहिरे आदी उपस्थित होते.



# पनवेल परिसरात गरीब व निराधार नागरिकांना ब्लँकेटचे वाटप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनीतील पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट तसेच तीर्था श्रमिक माथाडी व जनरल कामगार संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल रेल्वे स्थानक व पनवेल बस स्थानक परिसरातील थंडीचा सामना करणाऱ्या गरीब, निराधार आणि उघड्यावर झोपणाऱ्या नागरिकांना ब्लँकेट वाटप करण्यात आले. वाढत्या थंडीपासून संरक्षण मिळावे, उबदार रात्री लाभाव्यात आणि सर्वांना माणुसकीची ऊब मिळावी, हा या उपक्रमामागील हेतू असल्याचे समजते.



संस्थेचा हा उपक्रम दरवर्षी सातत्याने राबवला जात असून, यावर्षीही सेवाभाव, सामाजिक जाणीव आणि सामूहिक सहभागाच्या जोरावर हा उपक्रम अत्यंत यशस्वीपणे पूर्ण झाला. या वेळी अरुण गोविंद जाधव, अध्यक्ष-पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट तथा तीर्था श्रमिक माथाडी व जनरल कामगार संघटना, यांनी स्वतः उपस्थित राहून उपक्रमाचे मार्गदर्शन केले.तर मनोज महाडिक, रेश्मा कुरुप (सामाजिक कार्यकर्त्या - पनवेल), सुनील कुरुप, रोहित इंगळे, शीतल आंबेरकर तसेच इतर मान्यवर महिला सदस्यांनी सक्रिय सहभाग नोंदवत कार्यक्रमाला बळकटी दिली. सर्व सदस्यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे हा सामाजिक उपक्रम अधिक परिणामकारक ठरला.

स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाचे मनापासून स्वागत केले असून, समाजातील गरजू घटकांना थंडीपासून संरक्षण देण्यासाठी अशा संवेदनशील उपक्रमांनी माणुसकी अजूनही जिवंत असल्याचे पुन्हा अधोरेखित केले.

# 'आवाज महामुंबईचा' वर्धापन दिन

**पनवेल, उरण : बातमीदार**

आवाज महामुंबईचा चॅनेलचा पहिला वर्धापन दिन चिरनेर येथील मानसी फार्म येथे मोठ्या दिमाखात आणि उत्साहात संपन्न झाला.

या वेळी अनेक मान्यवर आणि आवाज महामुंबईचा चॅनेल चे राज्यभरातील पत्रकार आणि त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. योग्य अचूक आणि वेगवान बातमीबद्दल डॉ. मेधा किरीट सोमैया यांनी संपादक मिलिंद खारपाटील यांचे कौतुक केले. शिवनेरी किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांची स्वराज्याची प्रेरणा घेऊन सर्व पत्रकारांना सोबत घेऊन हे चॅनेल सुरू केल्याची माहिती त्यांनी दिली. या कार्यक्रमात उद्घाटक राजा खारपाटील, सामाजिक कार्यकर्ते विद्याधर ठाकूर, आगरी समाज परिषदेच्या उरण तालुकाध्यक्षां सीमा घरत, पत्रकार धम्मशील सावंत आदी मान्यवरांनी त्यांच्या भाषणातून चॅनेलसाठी शुभेच्छा दिल्या.

आगरी समाज परिषदेच्या उरण तालुका अध्यक्षा सीमा घरत यांनी संपादक मिलिंद खारपाटील यांची आगरी समाज परिषदेच्या उरण तालुका चिटणीस पदी निवड जाहीर केली. या वेळी उपस्थित पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबियांकडून छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवराय अशा घोषणा देण्यात आल्या. प्रास्ताविक संजय होळकर यांनी केले. संपादकीय मनोगत मिलिंद खारपाटील यांनी व्यक्त केले. आभार सुदर्शन जाधव यांनी मानले.

# रसायनीतील पिल्लई महाविद्यालयात कार्यशाळा



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

भारत सरकारच्या अटल अकॅडमी वाणी या उपक्रमांतर्गत पिल्लई एचओसी अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, रसायनी संस्थेत अटल वाणी या तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचा उद्देश मराठी भाषेतून शिक्षक, संशोधक व अभ्यासक यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या बदलत्या प्रवाहांची जाणीव करून देणे व त्यांच्या अध्यापन आणि संशोधन कार्यात त्यांचा प्रभावी उपयोग करता येईल यासाठी आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध करून देणे हा होता.

औद्योगिक ४.० ही एक वेगाने विकसित होणारी प्रणाली आहे, जिथे डेटा आणि माहितीचे स्वयंचलित पद्धतीने संकलन केले जाते आणि उत्पादन तंत्रज्ञानांचा वापर अधिक एकात्मिक व बहुआयामी पद्धतीने केला जातो. ९ ते ११ डिसेंबर २०२५ या कालावधीत आयोजित या कार्यशाळेत नामवंत तज्ज्ञ वक्त्यांनी आपले विचार मांडले. त्यांनी औद्योगिक ४.० मधील उदयोन्मुख संधी, डिजिटल शिक्षण साधनांचा वापर, नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती तसेच संशोधनातील नवे दृष्टिकोन या विषयांवर सखोल माहिती दिली. प्रत्येक सत्रानंतर सहभागींसोबत संवादात्मक चर्चा झाली. ज्यामुळे शिक्षक व संशोधकांना प्रत्यक्ष अनुभवाधारित शिकण्याची संधी मिळाली.

या विशेष कार्यक्रमास डॉ. अशोक खाडे आणि पिल्लई अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातर्फे डॉ. जे. डब्ल्यू, बाकल, प्राचार्य, डॉ. गजेंद्र पाटील, कार्यशाळा संचालक मेकानिकल इंजिनिअर विभागप्रमुख, डॉ. नडार एम. डी., कार्यशाळा सहसंचालक यांनी महाविद्यालयातर्फे कार्यक्रमाचे नियोजन केले होते.

# फोरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने श्रीवर्धन नगर परिषदेचा लाखो रुपयांचा कर बुडवला

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन शहरातील जीवनाबंदर जेट्टीच्या निर्माणाचे बांधकाम सुरू आहे. सदरचा बांधकाम करण्याचा ठेका महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून फॉरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने घेतला आहे. सदर जेट्टीचे बांधकाम दोन ठिकाणी सुरू आहे. जीवनाबंदर व मुळगाव कोळीवाडा या ठिकाणी बांधकामासाठी मोठमोठ्या दगडांची वाहतूक दहा चाकी डंपर मधून केली जात आहे. यासाठी श्रीवर्धन नगर परिषदेच्या रस्त्याचा वापर मागील दोन वर्षांपासून होत असून सदर इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने नगरपरिषदेची कोणत्याही प्रकारची परवानगी घेतलेली नाही.




तसेच कोणताही कर नगर परिषदेला भरलेला नाही. त्यामुळे श्रीवर्धन नगर परिषदेचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले आहे. तसेच श्रीवर्धन शहरातील ज्या रस्त्यांवरून अवजड वाहतूक केली जाते, ते रस्ते पूर्णपणे निकामी झाले आहेत. रस्त्याच्या दोन्ही बाजूची पिचिंग पूर्णपणे ढासळली असून अनेक वेळा अनेक ठिकाणी रस्ता खचत आहे. सदर कंपनीकडून खचलेल्या रस्त्याच्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात काँक्रीट ओतण्यात येत आहे. तरीही जर एखादा अवजड वाहतूक करणारा भरलेला डंपर रस्ता खचून पलटी झाल्यास मोठ्या प्रमाणावर जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दगडांच्या होणाऱ्या या क्षमतेपेक्षा अवजड वाहतुकीमुळे श्रीवर्धन शहरातील रस्त्यांची अक्षरशः दुर्दशा झाली आहे. तसेच प्रादेशिक परिवहन विभाग पेण यांच्याकडून देखील या क्षमतेपेक्षा जास्त अवजड वाहतुकीवर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात येत नाही. रस्त्याची क्षमता दहा ते पंधरा टन इतके वजन वाहून नेण्याची असताना त्यावरून ३२ ते ३५ टन दगडांचे भरलेले डंपर वाहतूक करण्यात येत आहेत. अनेक वेळा या डंपर चालकांकडून अनेक छोटे मोठे अपघात देखील घडत असतात.

> **फोरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने श्रीवर्धन नगर परिषदेकडून वाहतुकी संदर्भात कोणतीही परवानगी घेतलेली नाही. तसेच रस्ता वापरण्याचा कोणताही कर भरलेला नाही.**
> **–जीवन पाटील, मुख्याधिकारी, श्रीवर्धन नगर परिषद.**

# कर्जत पोलिसांनी चोरी व गहाळ झालेले ४२ मोबाईल केले मालकांना परत




**कर्जत : प्रतिनिधी**

चार वर्षात कर्जत पोलीस स्टेशन हद्दीतून चोरी व गहाळ झालेले ४२ मोबाईल पोलिसांनी इतर राज्यातून कर्जत पोलिसांनी ताब्यात घेतले व त्या मालकांना ते परत दिले आहेत सुमारे १४ लाख २७ हजार रुपयाचे किंमतीचे मोबाईल मालकांच्या स्वाधीन करण्यात आले आहेत.

कर्जत पोलीस ठाणे हद्दीतील चोरी, गहाळ झालेले मोबाईल सी ई आय आर पोर्टल द्वारे महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, छत्तीसगड, तसेच बिहार राज्यातून कर्जत पोलिसांनी शोध घेऊन ताब्यात घेतले असून ४२ मोबाईल १४ लाख २७ हजार किंमतीचे मोबाईल दि. १० डिसेंबर रोजी कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड यांच्या हस्ते परत करण्यात आले,

याप्रसंगी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भोसले, सहाय्यक निरीक्षक राहुल वरोटे, उपनिरीक्षक सुशांत वरक, हवालदार स्वप्निल येरुणकर, पोलीस हवालदार समीर भोईर, नाईक केशव नागरगोजे, विठ्ठल गावस उपस्थित होते

# आजपासून माणगांव येथे कोकण फेस्टिव्हल

**माणगाव :** माणगांव येथे शुक्रवार दिनांक १२ ते सोमवार दिनांक २२ डिसेंबर पर्यंत कोकण फेस्टिव्हल–२०२५ होणार आहे. विविध खाद्य पदार्थ आणि भरगच्च सांस्कृतिक कार्यक्रमाच्या मेजवानीचा आनंद माणगांवकरांना मिळणार आहे. शुक्रवारी सांयकाळ ६.०० वाजता उद्धाटन होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध जेष्ठ अभिनेत्री अलका कुबल– आठले, चला हवा येवु द्या फेम डॉ. निलेश साबळे ,अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजे भोसले, माणगांवचे राष्ट्रवादीचे नेते ॲड. राजीव साबळे , नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे , माणगांवचे प्रांत, तहसीलदार, मुख्याधिकारी, गट विकास अधिकारी , माणगांव न्यायालयातील न्यायाधीश यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत रानवलीत कुशन मेकिंग प्रशिक्षण



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत ग्रामपंचायत रानवली (ता. श्रीवर्धन) येथे यशस्वीरित्या कौशल्य विकास प्रशिक्षण पूर्ण झाले. ५ दिवसांच्या 'कुशन मेकिंग' (उशी बनवणे) कोर्सचा समारोप नुकताच झाला असून, प्रशिक्षणार्थींना मान्यवरांच्या हस्ते शासनमान्य प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली.

रानवली ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात आयोजित करण्यात आलेल्या या प्रशिक्षणामुळे गावातील महिलांना घरबसल्या उत्पन्न मिळवण्याचा एक नवा मार्ग मिळाला आहे. 'कुशन मेकिंग' या ५ दिवसीय कोर्समध्ये प्रशिक्षणार्थींनी अत्याधुनिक तंत्र आणि डिझाइन्सचा अभ्यास केला.

प्रशिक्षणादरम्यान, केवळ कुशन बनवण्याचे तांत्रिक कौशल्यच नाही, तर उत्पादनाचे ब्रँडिंग, मार्केटिंग आणि विक्री व्यवस्थापन यावरही मार्गदर्शन करण्यात आले. त्यामुळे महिला आता केवळ कुशल कारागीरच नव्हे, तर उद्योजक म्हणूनही सक्षम होणार आहेत.प्रशिक्षणाच्या यशस्वी समापनानंतर प्रमाणपत्र वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी उपस्थित मान्यवर सुरेश मांडवकर: सरपंच, ग्रामपंचायत रानवली, अभिजीत माने:ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य आणि मोठ्या संख्येने प्रशिक्षणार्थी महिला सरपंच सुरेश मांडवकर यांनी यावेळी बोलताना, महिलांनी या प्रशिक्षणाचा पुरेपूर वापर करून आपला स्वतःचा व्यवसाय सुरू करावा. ग्रामपंचायत यासाठी सर्वतोपरी मदत करेल, असे आश्वासन दिले.


## पनवेल महानगरपालिका
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६**

ई–मेल : panvelcorporation@gmail.com दुरध्वनी कार्यालय : ०२२–२७४५८०४०/४१/४२
pmc.townplanning@gmail.com वेबसाईट – panvelcorporation.com

### शहर अभियंता विभाग
### ई-निविदा सूचना

**आयुक्त पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निमशासकीय** (Central Government / State Government / Government under taking) **विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी–१ शतमान पध्दतीनुसार ई–निविदा मागवीत आहेत.**

| अ.क्र. | निविदा क्रमांक | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (without GST) |
|---|---|---|---|
| १ | PMC/CE/२७४/ २०२५–२६ | **पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती–अ, खारघर सेक्टर–१२ (भाग –अ) मधील अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण व पावसाळी गटार बांधणे.** | २५,६७,३८,६९३/– |

या कामाच्या ई–निविदे बाबतची माहिती महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर **दि. १५/१२/२०२५** रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.

**जा.क्र :–पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ६९०/७१४/२०२५**
**दिनांक :– ११/१२/२०२५**

**सही/–**
**अतिरिक्त आयुक्त– I**
पनवेल महानगरपालिका


# देशी व विदेशी स्थलांतरित पाहुण्यांचे आगमन

## पक्षी निरीक्षक व पर्यटकांना पर्वणी



**पाली :** पाली सुधागड सह रायगड जिल्ह्यात लांबलेला पाऊस व प्रतिकूल हवामान याचा पक्षांच्या स्थलांतरावर परिणाम झाला होता. मात्र आता वातावरणात अनुकूल बदल झाले आहेत. थंडीच्या हंगामात हजारो किलोमीटरचा प्रवास करून विविध देशी व विदेशी स्थलांतरित पक्षी रायगड जिल्ह्यात दाखल होत आहेत. या पक्षांसाठी वातावरण अनुकूल झाले आहे. थंडीही चांगली पडू लागली असल्याने हे स्थलांतरीत व स्थानिक पक्षी स्थिरावले आहेत. त्यामुळे पक्षी अभ्यासक, निरीक्षक व पर्यटक सुखावले

स्थलांतरित पक्षांसाठी पोषक परिस्थिती निर्माण झाली असल्याने स्थलांतरित पक्षी जिल्ह्यात दाखल झाले आहेत. गुलाबी थंडी ची चाहूल लागल्याने निसर्गरम्य रायगड जिल्ह्यात परदेशी स्थलांतरित पक्षी आणि काही स्थानिक स्थलांतरित पक्षांची रेलचेल पाहायला मिळत आहे. गवंतामधील कीटक व आळ्या खाण्यासाठी आणि साठलेल्या जलाशयामधील पाण्यातील कीटक, कृमी, मृदुकाय जीव–जंतू खाण्यासाठी तसेच समुद्र किनारे, दलदलीचे भाग यामधील छोटे खेकडे, मृदुकाय प्राणी, मासे, जल कीटक हे खाऊन पर्यावरणाचे संरक्षण व जैवविविधता समृद्ध करण्यात हे पक्षी महत्वाची भूमिका बजावत असतात. या पक्षांचे दर्शन जिल्ह्यातील समुद्रकिनारे, दलदलीच्या जागा, जंगले, भातशेते ,खाड्या तसेच गवताळ प्रदेशात होत आहे. परिणामी पक्षी अभ्यासक व निरीक्षकांना तसेच पर्यटकांना ही मोठी पर्वणीच आहे.

**परदेशी स्थलांतरित पक्षांचा बोलबाला**

ब्ल्यू थ्रोट (शंकर) युरोपियन रोलर (तास पक्षी), युरेशियन रायनेक (मानमोडी) सायबेरियन स्टोनचाट (गप्पीदास पक्षी) , बंटिंग्स (भारीट पक्षी), पॅलिड हॅरिअर (पांढूरका भोवत्या) या परदेशी स्थलांतरित पक्षांचा बोलबाला येथे पहायला मिळतो.

**स्थानिक पक्षांचे आगमन**

पॅराडाईज फ्लाय कॅचेर ( स्वर्गीय नर्तक), इंडियन रोलर (भारतीय तास पक्षी), श्राईक (खाटीक), युरेशियन हुपू (हुदहुद), क्रेस्टेड बंटीग (युवराज) या स्थानिक पक्षांचे आगम सुरु झाले आहे.

**समुद्रकिनारे गजबजले**

पक्षी अभ्यासक शंतनू कुवेसकर यांनी सांगितले हजारो किनारी पक्षी महाराष्ट्राच्या किनारपट्टीच्या पाणथळ प्रदेशात आणि वालुकामय किनाऱ्यांवर येतात. हे स्थलांतर हा एक उल्लेखनीय प्रवास आहे, ज्यामध्ये पक्षी त्यांच्या प्रजननाच्या ठिकाणापासून हजारो किलोमीटर प्रवास करून सायबेरिया आणि उत्तर युरोप सारख्या ठिकाणी कडाक्याच्या थंडीपासून वाचण्यासाठी किंवा चीनमधूनही उष्ण हवामानात मुबलक अन्न स्रोत शोधण्यासाठी भारतात येतात. भारतातील हिवाळी पक्षी मध्य आशियाई फ्लायवे वापरतात.

येथील समुद्र किनारी प्रामुख्याने तुतवार, चिखल्या, कुरव, व्हिमब्रेल्स, लहान कोरल, युरेशिअन कोरल, सामान्य टीलवा, हिरवा तुतवार , पाणलावे , सुरय , समुद्री काळे बगळे आणि कालवफोडे आणि चिंबोरी खाऊ, रंगीत भाट तितर हे असामान्य पक्षी आहेत. पक्षी छायाचित्रकार या पक्षी हालचालींच्या कृती छायाचित्रबद्ध करण्याच्या संधीचा आनंद घेतात.

**जगण्यासाठी प्रवास**

उत्तर गोलार्धातील युरोप ,रशिया आणि उत्तर अमेरिका यासारख्या देशात थंडीच्या दिवसात पडणाऱ्या बर्फामुळे जमिनीवरील भूभाग हा बर्फाने आच्छादलेला असतो त्यामुळे पक्षांना खाद्य मिळणे कठीण होऊन जाते म्हणून हे पक्षी विविध देशात स्थलांतर करून आपली उपजीविका भागवतात. तसेच आपल्याकडे पडणारी थंडी आणि पुरेशा प्रमाणात मिळणारे खाद्य तसेच योग्य अधिवास या सर्व कारणांमुळे या पक्षांना आपली घरटी बांधून पिल्लांचे संगोपन करणे सोपे जाते. म्हणून बऱ्याच स्थलांतरित पक्षांचा विणीचा काळ सुद्धा हाच असतो.

> **रायगड जिल्ह्यात ४०० हून अधिक पक्षी प्रजातींची नोंद आहे. स्थलांतरित पक्षांसाठी येथे अनेक प्रकारचे पोषक नैसर्गिक अधिवास आहेत. त्यामुळे चांगल्या संख्येने पक्षी दाखल होतात. समुद्रकिनारे, पाणथळीचे प्रदेश, घनदाट जंगले, माळराने अशा अधिवासांमध्ये विविध प्रकारच्या पक्षी प्रजाती जिल्ह्यात थंडीच्या मोसमात येतात. पक्षी निरीक्षक आणि छायाचित्रकारांसाठी ही गुलाबी थंडी पर्वणीच असते.**
> **–शंतनु कुवेसकर, पक्षी निरीक्षक व वन्यजीव अभ्यासक**


## पनवेल महानगरपालिका
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६**

ई–मेल : panvelcorporation@gmail.com दुरध्वनी कार्यालय : ०२२–२७४५८०४०/४१/४२
pmc.townplanning@gmail.com वेबसाईट – panvelcorporation.com

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे पनवेल येथील मंजूर विकास योजना नुसार न.भू.क्र. १२७९, १२७९/२/अ/१ मधील ९.१५ मी. रुंद रस्त्याखालील बाधित क्षेत्र पनवेल महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या (टी.डी.आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजाखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पनवेल महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत सहाय्यक संचालक, नगररचना, पनवेल महानगरपालिका पनवेल ४१० २०६ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास खालील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधिताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पनवेल महानगरपालिका जमीन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टी.डी.आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल, त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १) मिळकतीचे वर्णन :– मौजे पनवेल, ता. पनवेल येथील श्री मंगल कलश को. ऑ. हौ. सोसायटी यांचे मालकीच्या जमीन मिळकतीमधील प्रस्तावित ९.१५ मी. रुंदीच्या विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र पुढीलप्रमाणे :–

१) मौजे– पनवेल, न.भू.क्र. १२७९, १२७९/२/अ/१ रस्त्यासाठी बाधीत – ४६.०० चौ. मी.

त्यास मोजणी नकाशानुसार चतुःसीमा खालीलप्रमाणे –
पुर्वेस : लागून न.भू.क्र. १२८५
पश्चिमेस : लागून रस्ता
दक्षिणेस : लागून न.भू.क्र. १२७७, १२७८/१
उत्तरेस : लागून रस्ता

टिप :– उक्त जागा दर्शविणारा नकाशा पाहणीसाठी नगररचना विभागात ठेवण्यात आला आहे.

**जा.क्र.पमपा/नगवि/टिडीआर/२६–२५/१२९२/२०२५**
**दिनांक : ११/१२/२०२५**

**सही/–**
**सहाय्यक संचालक, नगररचना**
**पनवेल महानगरपालिका**

टिप – सदरची जाहीर नोटीस पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

## राष्ट्रीय तायक्वॉन्डो स्पर्धेसाठी

# रायगडच्या सहा खेळाडूंची निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तायक्वॉन्डो फेडरेशन ऑफ इंडिया ही तायक्वॉन्डो खेळाची भारतातील एकमेव शिखर संघटना आहे. या संघटनेला इंडियन ऑलिंपिक व भारत सरकारच्या क्रीडा मंत्रालयाने मान्यता दिलेली असून महाराष्ट्रमध्ये तायक्वॉन्डो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (मुंबई) या अधिकृत राज्य संघटनेने लातुर येथे राज्यस्तरीय स्पर्धेचे यशस्वी आयोजन केले होते.




या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये रायगडचे खेळाडू प्राजक्ता अंकोलेकर, मुग्धा भोसले, प्रशांत घरत, सेजल कानेकर, अनन्या चितळे व गायत्री भंडारे यांनी आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून सुवर्णपदक पटकावले. ११ ते १४ डिसेंबर बालयोगी इंनडोर स्टेडियम हैदराबाद येथे होणाऱ्या सीनियर राष्ट्रीय तायक्वॉन्डो स्पर्धेत प्राजक्ता अंकोलेकर, मुग्धा भोसले, प्रशांत घरत सेजल कानेकर, अनन्या चितळे व गायत्री भंडारे आणि पंच म्हणून तेजस माळी हे महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

या राष्ट्रीय स्पर्धेतील सुवर्णपदक विजय खेळाडू जागतिक तायक्वॉन्डो स्पर्धेत भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करणार आहेत असे तायक्वॉन्डो मुख्य प्रशिक्षक सुभाष पाटील यांनी सांगितले. या खेळाडूंना तायक्वॉन्डो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र व रायगड तायक्वॉन्डो असोसिएशनचे सर्व पदाधिकारी व इतर मान्यवरांनी विषय सत्कार करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# सीकेटी कॉलेजमध्ये हँडबॉल स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगु काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (अधिकारप्रदत्त स्वायत्त) आणि मुंबई विद्यापीठ यांच्या समन्वयाने आंतर महाविद्यालयीन हँडबॉल स्पर्धा ११ व १२ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे.

या आंतर-महाविद्यालयीन हँडबॉल स्पर्धेचे उद्घाटन चांगु काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे प्राचार्य व मुंबई शहर झोन-१चे उपाध्यक्ष प्रो. डॉ. एस.के.पाटील व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव यांनी केले. त्याचबरोबर मुंबई शहर झोन-१ सचिव डॉ.मनोज वर्मा, मुंबई शहर झोन-१ स्पर्धा सचिव डॉ. व्ही. बी. नाईक व मुंबई शहर झोन-१ स्पर्धा सह-सचिव मा. पूनम मुजावर यांची उपस्थिती लाभली.

स्पर्धेमध्ये १२ मुलांचे संघ आणि १० मुलींच्या संघांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिमखाना विभागाचे चेअरमन डॉ. व्ही. बी. नाईक, सहसंचालक प्रा. अनिल नात्ती, प्रा. भरत जितेकर व प्रा. प्रतिज्ञा पाटील, जिमखाना विभागाचे सर्व सदस्य यांनी विशेष परिश्रम घेत आहे.

# अंकुश मोरे गौरव कबड्डी १५ डिसेंबरपासून

**मुंबई : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय पंच, ज्येष्ठ कबड्डी संघटक अंकुश रामचंद्र मोरे यांच्या एकसष्ठीपूर्ती निमित्त गोरेगावच्या अभिनव कला आणि क्रीडा अकॅडेमीने अभिनव क्रीडा मंडळ गोरेगाव, एकता क्रीडा मंडळ वडगाव आणि स्पोटवूट यांच्या सहकार्याने येत्या १५ ते २० डिसेंबर या कालावधीत भव्य जिल्हास्तरीय सुपर लीग आणि बाद फेरी कबड्डी स्पर्धेचे आयोजन दिंडोशी, गोरेगाव (पूर्व) येथे करण्यात आले आहे.

नागरी निवारा परिषद क्रमांक ८ येथील एनएनपी शाळेसमोरील प्रांगणात खेळवल्या जाणाऱ्या या स्पर्धेत महिलांचे १२, तर पुरुषाचे २४ संघ विजेतेपदासाठी झुंजणार आहेत. सायंकाळी ६ ते रात्री ११ या वेळेत या सामान्यांची पर्वणी विभागातील कबड्डी शौकिनांना उपलब्ध होणार आहे.

कबड्डी प्रसार आणि प्रचारासाठी गेली ४० वर्षे कार्यरत असणारे आंतरराष्ट्रीय पंच, राष्ट्रीय प्रशिक्षक आणि कबड्डी संघटक अंकुश मोरे यांच्या एकसष्ठीपूर्तीनिमित्त अभिनव कला क्रीडा अकॅडेमीने गोरेगाव पूर्वेत भव्य जिल्हास्तरीय पुरुष आणि महिला कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले आहे.

कोकणच्या खेड तालुक्यातील महाळुंगे येथे भव्य अभिनव कला क्रीडा नगरी उभारून ग्रामीण भागातील क्रीडापटूंना कबड्डी आणि अन्य खेळांचे प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याचे स्वप्न मोरे यांना साकारायचे आहे. त्यासाठी कबड्डी आणि अन्य खेळाच्या चाहत्यांनी आपल्याला सहकार्य करावे आणि शुभेच्छा द्याव्यात, असे आवाहन त्यांनी केले आहे. स्पर्धेच्या समारोपाला शिक्षणतज्ज्ञ आणि लेखक अरविंद वैद्य यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे.

# माणगावच्या मयूर बांगाराचे नेमबाजीत सुयश

## राज्य स्पर्धेसाठी निवड

**माणगाव : प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य आयोजित फिल्ड कंपाउंड आर्चरी जिल्हास्तरीय स्पर्धा ७ डिसेंबर २०२५ रोजी रायगड जिल्हा क्रीडा संकुल, अलिबाग येथे उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत अशोक दादा साबळे विद्यालय व माणगाव ज्युनिअर कॉलेजचा इयत्ता ११वी सायन्सचा विद्यार्थी मयूर पांडुरंग बांगारा याने नेमकौशल्याचे अफलातून प्रदर्शन करत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला.



मयूरची कामगिरी इथेच थांबली नाही. पुढे ८ डिसेंबर २०२५ रोजी मुंबई, कांदिवली येथे झालेल्या वयोगट १७ वर्षे मुले फिल्ड कंपाउंड आर्चरी विभागीय स्पर्धेतही त्याने प्रथम क्रमांकाची बाजी मारत आपली गुणवत्ता सिद्ध केली. सलग दोन स्पर्धांतील विजयानंतर त्याची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी अधिकृत निवड झाली आहे.

माणगावातील क्रीडा क्षेत्रासाठी हा अभिमानाचा क्षण असून, मयूरच्या या उज्ज्वल कामगिरीचे कौतुक सर्वत्र होत आहे. संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, सचिव कृष्णा भाई गांधी, स्कूल कमिटी चेअरमन नरेंद्र गायकवाड, तसेच संस्थेचे सदस्य माजी आमदार अनिकेत तटकरे, नितीन बामगुडे, डॉ. आबासाहेब पाटणकर, ॲड. विनोद घायाळ, यांनी मयूरचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या.

अशोक दादा साबळे विद्यालय व ज्युनिअर कॉलेजचे मुख्याध्यापक व प्राचार्य डी. एम. जाधव, उपमुख्याध्यापक उभारे, उपप्राचार्य बिरादार, पर्यवेक्षक सोनावणे, सर्व शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी मयूरचे मनापासून अभिनंदन केले. राज्यस्तरीय फिल्ड कंपाउंड आर्चरी स्पर्धेतही मयूर बांगारा उत्तुंग यश संपादन करो, अशा शुभेच्छा त्याला मिळत आहेत.

# शरद कुंभार यांची राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेसाठी निवड

**चौक : प्रतिनिधी**

सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर चौक शाळेचे क्रीडा शिक्षक शरद कुंभार यांची राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



मुंबई येथे झालेल्या शिक्षक अधिकारी क्रीडा स्पर्धांमध्ये रायगड जिल्हा खो-खो संघाने मुंबई विभागस्तरीय स्पधत मुंबई शहर, ठाणे जिल्हा, पालघर जिल्हा व मुंबई उपनगर अशा बलाढ्य संघांचा पराभव करत अंतिम विजेतेपद पटकावले. सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय चौक शाळेतील क्रीडा शिक्षक शरद कुंभार यांच्या कुशल नेतृत्वाखाली रायगड संघाने ही चमकदार कामगिरी केली. विजयी रायगड संघ राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये मुंबई विभागाचे नेतृत्व करणार आहे.

एका कार्यक्रमात आधार चॅरिटेबल ट्रस्ट अध्यक्ष व देशमुख मराठा समाज मंडळ खालापूर अध्यक्ष प्रभाकर देशमुख यांच्या हस्ते क्रीडा शिक्षक कुंभार यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी अनिल बडेकर, सतीश बांबले, शिक्षक, क्रीडाप्रेमी उपस्थित होते.

# क्रिकेट स्पर्धेत बोरघर संघ विजेता

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील श्री धावीर महाराज प्रसन्न असोसिएशन आयोजित घोसाळे येथील क्रिकेट स्पर्धेत श्री काळभैरव बोरघर संघाने अंतिम सामन्यात स्वयंभू महादेववाडी संघाचा पराभव करून विजेतेपदावर नाव कोरले. तालुक्यातील एकूण १६ संघांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता.

अंतिम सामन्यात श्री कालभैरव बोरघर संघाने नाणेफेक जिंकत प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला होता. या संघाच्या दिवेश भगत, युवराज माने, पियुष भगत आणि प्रणित भगत यांच्या अचूक व भेदक गोलंदाजीसमोर महादेववाडी संघाला निर्धारित चार षटकात केवळ २९ धावा करता आल्या.

या माफक धावांचा पाठलाग करताना बोरघरच्या फलंदाजांनी चौकार-षटकारांची आतषबाजी करत केवळ दोन शतकातच सामन्याचा निकाल आपल्या बाजूने लावला आणि स्पर्धेची ट्रॉफी उचलली.

स्पर्धेत तृतीय क्रमांक दर्या किनारा अष्टमी संघ, तर चतुर्थ क्रमांक ओम साईराम दमखाडी संघाने पटकावला. वैयक्तिक पुरस्कारांमध्ये मालिकावीर दिवेश भगत, उत्कृष्ट फलंदाज केतन भगत, उत्कृष्ट गोलंदाज युवराज माने यांना गौरविण्यात आले.



# गुरुकुल तायक्वांदो अकॅडमीचे घवघवीत यश

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

विभागीय क्रीडा संकुल, नाशिक येथे पाच दिवसीय महाराष्ट्र राज्यस्तरीय खुली तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धा २०२५-२६ यशस्वीपणे संपन्न झाली. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील गुरुकुल तायक्वांदो अकॅडमीने उत्कृष्ट कामगिरी करत ३ सुवर्ण, २ रौप्य आणि ३ कांस्य पदके जिंकली.यात

सुवर्णपदक विजेते - श्रवण भोसले (कॅडेट ३३ किलो वजनी गट- ओमकार भोसले (ज्युनियर ४५ किलो वजनी गट) - वियोना थेस्मा (ज्युनियर वैयक्तिक पुमसे)तर रौप्यपदक विजेते - रेहान सय्यद (कॅडेट ५३ किलो वजनी गट- मोहित गांधी (सिनियर ७४ किलो वजनी गट), कांस्यपदक विजेते- सिद्धार्थ शाही (सब-ज्युनियर २९ किलो वजनी गट) - प्रणूशा रावत (कॅडेट ५९ किलो वजनी गट) - संस्कृती जांभळे (ज्युनियर ४२ किलो वजनी गट)सहभागी खेळाडू- वेदश्री भोर (सब-ज्युनियर २६ किलो वजनी गट- अंश मोरे (सब-ज्युनियर ३२ किलो वजनी गट), धुर्वी पाटोळे (कॅटेड ४१ किलो वजनी गट)




ही स्पर्धा जागतिक तायक्वांदो संघटनेची संलग्न असलेल्या 'इंडिया तायक्वांडो' या राष्ट्रीय संघटनेची संलग्न व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनची मान्यताप्राप्त अधिकृत राज्य संघटना म्हणजेच महाराष्ट्र तायक्वांदो असोसिएशनने आयोजित केली होती. स्पर्धा प्रमुख म्हणून महाराष्ट्र शासनाचा दादोजी कोंडदेव पुरस्कार विजेते भास्कर करकेरा यांच्या मार्गदर्शनाखाली, राज्य संघटनेचे अध्यक्ष संदीप ओंबासे, महासचिव गफार पठाण, खजिनदार डॉ. प्रसाद कुलकर्णी, आदी कार्यकारी सदस्य व जिल्हा संघटनेचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये ही स्पर्धा खेळीमेळीच्या वातावरणात व पारदर्शकपणे पार पडली. या स्पर्धेतील सर्व पदक विजेते खेळाडू २०२५-२६ च्या राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या दुसऱ्या फेडरेशन कप स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत.

सर्व खेळाडूंना गुरुकुल तायक्वांदो अकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक रोहित सिनलकर तसेच सहाय्यक प्रशिक्षक प्रेम पाटणे यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व खेळाडूंना मुख्याध्यापक, शिक्षक तसेच आंतरराष्ट्रीय पंच व प्रशिक्षक तुषार सिनलकर, गुरुकुल तायक्वांदो अकॅडमीचे सर्व खेळाडू व पालक इत्यादी यांनी सर्व विजेत्यांचे हार्दिक अभिनंदन केले.

# जिजामाता स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा दिन साजरा

**नवी मुंबई : बातमीदार**

कार्यक्रमात विद्यार्थ्यांमधील क्रीडाभाव, संघभावना आणि निरोगी स्पर्धेचा उत्कृष्ट परिचय झाला. या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून सीनियर पीआय उमेश गवळी, एच.सी संजय जाधव, महिला पोलिस समितीच्या गौरी दिघे तसेच गजानन चारिटेबल संस्थेचे सचिव डॉ. व्ही. टी. पाटील उपस्थित होते.

भाषणात डॉ. व्ही. टी. पाटील यांनी क्रीडेमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, आत्मविश्वास आणि सर्वांगीण विकास घडतो हे अधोरेखित केले. दिवसाची सुरुवात भव्य मार्च-पास्टने झाली, त्यानंतर विविध धावण्याच्या स्पर्धा, मैदानी खेळ आणि आकर्षक सादरीकरणे जसे की एरोबिक्स, योग व रंगीबेरंगी ड्रिल्स यांनी कार्यक्रमाला अधिक सुंदर बनवले. या कार्यक्रमात जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.

शाळेचा गौरव वाढवणाऱ्या या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापिका सपना गुप्ता मॅडम यांच्या हस्ते पदके व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. विद्यार्थ्यांना पुढेही उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करत राहण्याचे प्रोत्साहन देण्यात आले.




# किकबॉक्सिंग स्पर्धेत आरकेजी पब्लिक स्कूलचे यश




**उरण : बातमीदार**

लोकनेते दि.बा. पाटील मंगल कार्यालय जासई उरण येथे नुकत्याच झालेल्या खेलो इंडिया अस्मिता वूमेन्स लीग २०२५ अंतर्गत किकबॉक्सिंग स्पर्धेमध्ये आरकेजी पब्लिक स्कूल जासईमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन यश संपादन केले आहे.

यामध्ये समृद्धी शिंदेने सुवर्ण, श्वेता सिंग, श्रेया म्हात्रे, खुशी गौड, हर्षिता यादव यांनी रौप्य, तर दिया पाटील व फातिमा शेख यांनी कांस्यपदक जिंकले. या विद्याथिनींना स्कूलचे चेअरमन संतोष घरत, शाळेच्या प्राचार्य वैशाली नगराळे, कर्मचारी सुरेखा पाटील यांचे मार्गदर्शन लाभले, तर किकबॉक्सिंग प्रशिक्षक संतोष मोकल, शुभम म्हात्रे, आकाश भिडे व केवल मोकल यांचे प्रशिक्षण लाभले.

स्पर्धेसाठी महाराष्ट्र किकबॉक्सिंगचे अध्यक्ष निलेश शेलार यांनीही हजेरी लावली होती. उत्तम यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आले.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com